रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ • अंक ९१
www.ramprahar.com

शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## लाल दहशतीचा अंत! २१० माओवाद्यांचे आत्मसमर्पण



**बस्तर** : केंद्र सरकारच्या नक्षलवादविरोधी मोहिमेत शुक्रवारचा (दि.१७) दिवस ऐतिहासिक ठरला. छत्तीसगडमध्ये तब्बल २१० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. त्यांनी आपली शस्त्रेही सुरक्षादलांकडे जमा केली. राज्य सरकार आणि सुरक्षा यंत्रणांच्या मते ही आतापर्यंतची सर्वात मोठी सामूहिक आत्मसमर्पणाची कारवाई आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवाद्यांच्या उच्चाटनासाठी ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. या मुदतीपूर्वीच इतक्या मोठ्या प्रमाणात नक्षलवादी हत्यार टाकून आत्मसमर्पण करणे हे नक्षलविरोधी मोहिमेसाठी मोठे यश आहे. दोन दिवसांपूर्वीच महाराष्ट्रातील गडचिरोलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता छत्तीसगडमधील नक्षलवाद्यांनी मोठ्या प्रमाणात मुख्यमंत्री विष्णू सहाय यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले आहे.

## अंतरंग

पाण्यासाठी गव्हाण ग्रामस्थांचा सिडको अधिकाऱ्यांना घेराव/३

वादळी पावसामुळे कर्जत, माणगावमध्ये बत्ती गुल/५

वनडे मालिकेआधी ऑस्ट्रेलियाचे पाच खेळाडू संघाबाहेर/८

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी १३५६ कोटींची मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

सप्टेंबर २०२५मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१.२१ हेक्टरवरील बाधित पिकांच्या मदतीसाठी १३५६ कोटी ३० लाख २२ हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.



मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्तीत मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदत थेट जिल्हास्तरावरूनच दिली जाणार आहे. त्यामुळे शासनस्तरावर प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यांना मदत त्वरित व कार्यक्षम पद्धतीने वितरीत होईल.

**जिल्हानिहाय निधी**

**सातारा :** ११ हजार ११३ शेतकऱ्यांच्या चार हजार २१९.२८ हेक्टरवरील बाधित पिकांच्या मदतीसाठी सहा कोटी २९ लाख तीन हजार रुपये, कोल्हापूर जिल्ह्यातील पाच हजार ८६० शेतकऱ्यांच्या एक हजार ६९६.३६ हेक्टरवरील बाधित पिकांच्या मदतीसाठी तीन कोटी १८ लाख रुपये.

**बीड :** आठ लाख सहा हजार ५१३ शेतकऱ्यांच्या सहा लाख ४४ हजार ९१८.५५ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी ५७७ कोटी ७८ लाख ९२ हजार रुपये.

**धाराशिव :** चार लाख चार हजार ६५६ शेतकऱ्यांच्या तीन लाख ११ हजार २९१.२३ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २९२ कोटी ४९ लाख २२ हजार रुपये.

**लातूर :** चार लाख १५ हजार ४९२ शेतकऱ्यांच्या २३ लाख सहा हजार ६२८.९९ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २०२ कोटी ३८ लाख १९ हजार रुपये.

**परभणी :** चार लाख ३९ हजार २९७ शेतकऱ्यांच्या दोन लाख ८५ हजार ८५३.७८ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २४५ कोटी ६४ लाख ४९ हजार रुपये.

**नांदेड :** ८३ हजार २६७ शेतकऱ्यांच्या ३२ हजार ७३.०२ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी २८ कोटी ५२ लाख ३७ हजार रुपये.

(छाया : अक्षय शार्दुल)



## 'रामप्रहर'च्या दिवाळी अंकात सर्व प्रकारचे साहित्य -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दैनिक रामप्रहरने दिवाळी अंकाची उज्ज्वल परंपरा कायम राखत यंदा सर्व प्रकारचे वैचारिक साहित्य वाचकांसाठी उपलब्ध केले आहे. 'मुक्तछंद' शीर्षक असलेला हा अंक सर्वस्पर्शी असून डिजिटल स्वरूपातही साकारल्याचे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १७) प्रकाशनावेळी काढले.

या कार्यक्रमास 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ, वृत्तसंपादक समाधान पाटील, उपसंपादक तन्वी गायकवाड-पवार, नितीन देशमुख, मुख्य आर्टिस्ट अरुण चवरकर, शशिकांत बारसिंग, ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, संजय कदम, मल्हार चॅनेलचे संपादक नितीन कोळी, गणेश धुमाळ, अविनाश डोयरिया आदी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कथा, कविता, लेख, व्यंगचित्र अशा सर्व साहित्याने सजलेल्या सर्वांगसुंदर दिवाळी अंकाचे कौतुक केले आणि सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

## खारघर आणि तळोजा परिसरातील गृहसंकुलांच्या समस्यांवर सकारात्मक चर्चा

### आमदार प्रशांत ठाकूर, सिडकोचे शांतनू गोयल यांच्या उपस्थितीत रहिवाशांची बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर आणि तळोजा क्षेत्रातील सिडकोनिर्मित गृहनिर्माण संकुल असलेल्या आसावरी, बागेश्री, केदार, मारवा, धनश्री व इतर गृहसंकुलांतील पदाधिकारी व रहिवाशांनी त्यांच्या विविध समस्यांच्या निवारणासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (दि. १७) सिडकोच्या कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीच्या अनुषंगाने या गृहनिर्माण सोसायट्यांचे रजिस्ट्रेशन, सुरक्षा, पाणी, स्वच्छता, वीज या समस्या सोडविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीला नितीन भोईर, खांडू खटरमल, संदीप वेथेकर, नवनाथ भोजने व इतर सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सिडकोतर्फे एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करून त्या अंतर्गत अभियांत्रिकी इस्टेट, पाणी व अन्य अधिकारी यांची कमिटी करून त्यांनी पंधरा दिवसांच्या आत या सर्व सोसायट्यांमध्ये जाऊन प्रत्यक्षात निरीक्षण करावे व सकारात्मक तोडगा काढण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. **(पान २ वर..)**

## आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधन

**राहुरी : प्रतिनिधी**



माजी मंत्री आणि राहुरीचे विद्यमान भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे शुक्रवारी (दि.१७) पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते.

आमदार शिवाजीराव कर्डिले यांना पहाटे त्रास जाणवू लागला. त्यांना अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. आमदार कर्डिले यांनी नगर-नेवासा आणि राहुरी मतदारसंघातून विधानसभेचे प्रतिनिधित्व केले होते. ते सहाव्यांदा आमदार होते. त्यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त होत आहे.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विकास देशमुख यांनी संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूलला शुक्रवारी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी स्कूलची पाहणी करून प्रगतीचा आढावा घेतला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत व सन्मान केला. या वेळी स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके, संस्थेचे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, भाजप उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर, शिवाजी अहिरकर, हर्षल फडके आदी उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये मंगळवारी सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांची 'दिवाळी पहाट'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका आयोजित आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ प्रायोजित सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. शहरातील वडाळे तलाव येथे मंगळवारी (दि. २१) सकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यंदाचे हे नववे वर्ष असून या वेळी सुप्रसिद्ध गायिका बेला शेंडे आपल्या सुमधुर आवाजात सुश्राव्य गीतांची मैफल सादर करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रवेश निःशुल्क असून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ कार्यालय मार्केट यार्ड पनवेल, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल, अमोल स्टेशनरी टिळक रोड पनवेल येथे मोफत प्रवेशिका उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९), गणेश जगताप (९८७०११६९६४), वैभव बुवा (९०२९४१०६९९) किंवा आदित्य उपाध्ये (९३२४६०३४७३) या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच या सुरेल मैफलीचा संगीत रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दीपावलीच्या आनंददायी वातावरणात बेला शेंडे यांच्या सुरेल स्वरांचा जल्लोष अनुभवण्याची संधी पनवेलकरांना लाभणार आहे.

## पत्रकार हर्षद कशाळकर मारहाणप्रकरणी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील दोषी



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील पत्रकार हर्षद कशाळकर यांना मारहाण केल्याच्या प्रकरणात शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांना अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी एम.बी. अत्तार यांनी दोषी ठरवले आहे. एका वर्ष चांगल्या वर्तणुकीचे हमीपत्र आणि पाच हजारांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

२०१९मध्ये लोकसभा निवडणूक मतमोजणी सुरू असताना जिल्हा क्रीडासंकुल येथील मतमोजणी केंद्रात घुसून जयंत पाटील यांनी पत्रकार कशाळकर यांना मारहाण केली होती. या प्रकरणी २४ मे २०१९ रोजी जयंत पाटील आणि अन्य दोघांवर अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक के.डी. कोल्हे यांनी या प्रकरणाचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी एम.बी. अत्तार यांच्या न्यायालयात सुरू होती. सुनावणीदरम्यान एकूण १३ जणांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. **(पान २ वर..)**

## खारघरमध्ये आज 'दिवाळी संध्या'



**पनवेल** : सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या दिवाळी संध्या या सांस्कृतिक मेजवानीचे दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले असून खारघर भाजपच्या वतीने शनिवारी (दि. १८) सायंकाळी ७ वाजता खारघरमधील गावदेवी मैदानावर हा संगीतमय कार्यक्रम होणार आहे. या वेळी 'राधा ही बावरी' फेम सुप्रसिद्ध गायक स्वप्नील बांदोडकर, गायक के. शिरीष, गायिका गुल सक्सेना व सपना हेमन यांचे गीत सादरीकरण होणार आहे. भाजपतर्फे दिवाळी सणाच्या निमित्ताने आयोजित संगीत, संस्कृती आणि कलेचा संगम साधणाऱ्या या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सांगीतिक आनंद घ्यावा, असे आवाहन भाजपचे खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील व अन्य पदाधिकाऱ्यांनी केले आहे.






# ग्रामपंचायतीमुळे शासनाच्या योजना ग्रामीण भागात पोहचतात -मंत्री तटकरे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

केंद्र व राज्य शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम ग्रामपंचायतीमार्फत होते. ग्रामपंचायत नसेल तर कुठलीही योजना प्रभावीपणे अंमलात येऊ शकत नाही, असे प्रतिपादन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी केले.

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श ग्रामसेवक पुरस्कार आणि गुणगौरव समारंभ क्षत्रीय समाज सभागृह, कुरूळ येथे उत्साहात पार पडला. त्या वेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, प्रकल्प संचालक प्रियदर्श मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, ग्रामसभा म्हटली की, गावकरी हजेरी लावतात, कारण त्यांना माहीत असते की, गावाच्या समस्या सोडविणारा खरा केंद्रबिंदू म्हणजे ग्रामपंचायत आणि त्याचे शिल्पकार म्हणजे ग्रामसेवक. मोठ्या लोकसंख्येच्या गावात ग्रामसेवकाचे काम अधिक आव्हानात्मक असते. त्यामुळे आदर्श ग्रामसेवक म्हणून गौरव होणे,ही जबाबदारी अधिक वाढविणारी बाब आहे.

या वेळी आमदार महेंद्र दळवी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनीही आपल्या मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामसेवकांना आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने गौरविण्यात आले.

जिल्ह्यातून मोठ्या संख्येने ग्रामसेवक उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते वाडगाव येथे वन विभागामार्फत आयोजित माझे वन उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

# तळोजा एमआयडीसीमध्ये खाद्य तेलाच्या ट्रकला भीषण आग

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीत पडघे फाटा परिसरात खाद्य तेलाने भरलेल्या एका ट्रकला आज अचानक आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहचत ही आग विझवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



पनवेल तळोजा रस्त्यावर आज तलोजा एमआयडीसीहद्दीत पडघे फाटा परिसरात जात असलेल्या एका तेलाच्या कंटेनरला अचानक भीषण आग लागली. स्थानिकांनी या घटनेची माहिती तळोजा वाहतूक पोलिसांना दिली. वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचत सदर आगीवर नियंत्रण मिळवले.

# झोपडीवासीयांच्या घरासाठी जागेचे सर्वेक्षण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर मतदारसंघातील झोपडीवासीयांना स्वतःच्या घराचा हक्क मिळावा या उद्दिष्टाने सुरू असलेल्या प्रयत्नांना आज नवा टप्पा प्राप्त झाला आहे. आग्रोळी गाव, सीबीडी बेलापूर येथे झोपडीवासीयांच्या जागेच्या सर्वेक्षणाच्या कामाला आज आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नाने औपचारिक सुरुवात करण्यात आली.

या उपक्रमाद्वारे अनेक वर्षांपासून झोपडीत राहणाऱ्या नागरिकांच्या घरकुल स्वप्नाला प्रत्यक्ष आकार देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही



केवळ सर्वेक्षणाची प्रक्रिया नसून हजारो कुटुंबांच्या आशा आणि भविष्याचा नवा अध्याय आहे, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

झोपडीवासीयांना स्वतःच्या मालकीचे, सुरक्षित आणि सन्मानाचे घर मिळवून देण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रक्रियेत अनेक अडथळे आले, तरी झोपडीवासीयांच्या पुनर्वसनाचा निर्धार आम्ही कायम ठेवला, असेही त्या म्हणाल्या.

बालतूबाई नगर, टाटा नगर, पंचशील नगर, जय दुर्गा माता नगर आणि संभाजी नगर या भागांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला प्रतिसाद दिला.

# रिस येथे विवाहितेचा छळ

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाणे हद्दीमधील रिस येथील साईराम सोसायटी बिल्डींग येथे राहणाऱ्या एका विवाहित महिलेला अमानूष वागणूक करत छळ केल्याची घटना घडली.

विवाहितेचा पती सुनित घोडे, सासरे शंकरराव घोडे (वय ७०), माया शंकर घोडे (वय ६२), नणंद सुप्रिता मुळगाव कोपगाव, जिल्हा अहमदनगर, सध्या राहणार रिस यांनी फिर्यादी विवाहितेला शारीरिक व मानसिक छळ करून शिवीगाळ करत क्रूरतेने वागणूक दिली. याबद्दल विवाहित महिलेने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

# अलिबाग बनावट नोटा प्रकरणातील आरोपी भूषण पतंगेचा उपचारादरम्यान मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील बनावट नोटा प्रकरणातील आरोपी भुषण पतंगे याचा मुंबईतील जे. जे. रुग्णालयात उपचारादरम्यान शुक्रवारी (दि. १७) मृत्यू झाला. त्यामुळे आता या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे.



अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी आपल्या पथकासह ३ ऑक्टोबर रोजी अलिबाग शहरातील मयेकर वाडीमधील भूषण पतंगे याच्या घरावर छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी १२ लाख रूपयांच्या बनावट नोटा हस्तगत केल्या होत्या. याशिवाय नोटा छापण्यासाठी वापरला जाणारा कलर प्रिंटर, नोटा कापण्यासाठीचा कटर जप्त केला आहे होते. भूषण पतंगे याला अटक केली. तो न्यायालयीन कोठडीत होता. त्याची प्रकृती बिघडल्यामुळे प्रथम अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यानंतर त्याला पुढील उपचारासाठी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात हलविण्या आले. जे.जे. रुग्णालयात उपचार सुरू असताना शुक्रवारी भूषण पतंगे याचा मृत्यू झाला.

# मुकबधिर विद्यार्थ्यांना दिवाळी भेट

## ज्ञानदीप शाळा आणि भावना फाऊंडेशनचा संयुक्त उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी हा 'दिव्यांचा सण' आहे, जो हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. ज्याचा अर्थ 'दिव्यांची रांग' असा होतो. अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक आहे. या काळात लोक घरे दिव्यांनी आणि रोषणाईने सजवतात, नवीन कपडे घालतात, मिठाई वाटतात आणि एकमेकांना भेटवस्तू देतात. हाच धागा पकडून ज्ञानदीप प्राथमिक शाळा करावेतील शिक्षक आणि भावना फाऊंडेशनचे सदस्य यांनी ज्ञानगंगा बहुवीकलांग संस्थेच्या प्रेरणा मतिमंद मुलांची शाळा रोहा, रायगड येथील दिव्यांग मुलांसोबत दिवाळी साजरी केली.




दिवाळी हा प्रकाशाचा सण असून, तो वाईटावर चांगल्याचा विजय साजरा करतो. या दिवसांमध्ये लोक दिवे लावतात, नवीन कपडे घालतात आणि एकमेकांना भेटवस्तू देतात.हेच ज्ञानदीप शाळेतील विध्यार्थी, पालक, सभासद, हितचिंतक व शिक्षक* यांनी वर्गणी काढून प्रेरणा शाळेतील दिव्यांग विधार्थ्यांना दिवाळी खाऊ, भेट वस्तू, खेळणी आणि शाळेस कपाट, घड्याळ व स्वयंपाकासाठी कडधान्य भेट दिली.

विद्यर्थ्यांना दिलेली भेट वस्तू पाहून प्रेरणा शाळेतील विधार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे आनंद ओसंडून वाहत होता. गेली अनेक वर्ष सामाजिक बांधिलकी जपत ज्ञानदीप शाळा हा उपक्रम साजरा करत आहे.या प्रसंगी मुख्याध्यापक बंकट तांडेल, गणपत गांगोडा व हरेश तांडेल, विजय हांडे, सविता पाटील, निता पाटील, अरविंद चलवादी आणि भावना फाऊंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

# बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामावर महापालिकेची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे, अतिरिक्त जिल्हा न्यायालय यांचे दि. ०३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार, नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



आयशा अपार्टमेंट, भुखंड क्र.वाय-१ ए, सेक्टर-१९, शहाबाज बेलापूर, नवी मुंबई यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालया मार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकामामध्ये निवासी व अनिवासी वापर चालू ठेवला होता. संबंधिताना दि. २४ एप्रिल २०२५ रोजी इमारत रिक्त करणेस पत्राव्दारे कळविले होते. दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सदर इमारत निवासी/ अनिवासी थांबविणेस ध्वनीक्षेपकाव्दारे सुचना करण्यात आल्या तसेच दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सदरची इमारत निष्कासनाची कारवाई सुरु करण्यात आली. सदर अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे.

या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, डॉ. अमोल पालवे, सहा. अभियंता श्री. आत्माराम काळे व विभागाती इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर मोहिमेसाठी मजूर-२५, व साधनसामुग्री वापरण्यात आली.

# चिमुरडीचा विनयभंग; सुरक्षारक्षकाला अटक

**पनवेल :** खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका इमारतीत काम करणाऱ्या ६९ वर्षीय सुरक्षारक्षकाने याच इमारतीत राहणाऱ्या आठ वर्षीय मुलीसोबत अश्लील व लैंगिक चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भारत बुचुन गौड असे या सुरक्षारक्षकाचे नाव असून त्याने पीडित मुलीसोबत अनेकवेळा अश्लील व लैंगिक चाळे केल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणाची माहिती पीडित मुलीच्या घरच्यांना समजल्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी भारत गौडविरोधात गुन्हा नोंद करून अटक केली आहे.

पान १ वरुन

# खारघर आणि तळोजा परिसरातील गृहसंकुलांच्या समस्यांवर सकारात्मक चर्चा

सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांनी ही सूचना तातडीने मान्य करून कार्यवाही करण्याचे स्पष्ट केले व संकुलातील रहिवाशांचे समस्यांचे निवारण करण्यात येईल, असे आश्वासित केले. रजिस्ट्रेशनच्या बाबतीत सोसायटीने कागदपत्रांची पूर्तता केल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचेही त्यांनी मान्य केले.

या फलदायी बैठकीमुळे खारघर व तळोजा परिसरातील सिडकोनिर्मित गृहसंकुलांतील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या समस्यांच्या निवारणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पत्रकार हर्षद कशाळकर मारहाणप्रकरणी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील दोषी

यात फिर्यादी, तपासिक अंमलदार, पंच आणि साक्षीदार यांच्या साक्षी महत्त्वाच्या ठरल्या. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने माजी आमदार जयंत पाटील यांना भारतीय दंड विधान कलम ३२३ अन्वये दोषी ठरवले.

अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी एम.बी. अत्तार यांनी गुरुवारी (दि. १६) निकाल दिला. जयंत पाटील यांना एक वर्ष चांगल्या वर्तणुकीचे हमीपत्र लिहून देण्याचे तसेच पाच हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश अत्तार यांनी दिले आहेत. या प्रकरणात सरकारी वकील म्हणून प्रसाद ॲड. सुदाम पाटील, ॲड. नईमा घट्टे, ॲड. कविता परिट यांनी काम पाहिले.

# दागिन्यांची डबी लंपास

**पनवेल : वार्ताहर**

एसटी प्रवासादरम्यान एका महिलेकडे असलेल्या हॅन्डबॅगमधून सोन्याच्या दागिन्यांची डबी लंपास केल्याची घटना पनवेल एसटी स्टॅन्ड परिसरात घडली आहे.

सविता पाटील (वय ६६ रा. पोयनाड) या पनवेल एसटी स्टॅन्ड येथून शिवशाही बस मध्ये बसल्या असताना त्यांना त्यांच्याकडे असलेल्या हॅन्डबॅगची चैन उघडी दिसली. त्यावेळी त्यांनी अधिक तपासणी केली असता त्यांच्याकडे असलेल्या सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याच्या चार बांगड्या व सोन्याचा हार असा मिळून ११ लाख २० हजार रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# अभय योजनेला मुदतवाढ; आता १५ नोव्हेंबरपर्यंत शास्तीवर ७५ टक्के सूट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'अभय योजना' या शास्ती माफी योजनेला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. करदात्यांच्या वाढत्या मागणीनुसार महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेला आणखी १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.


या वाढीव कालावधीत, म्हणजे १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मालमत्ता कराची थकबाकी भरल्यास करदात्यांना ७५ टक्के शास्ती माफीचा लाभ मिळणार आहे. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

या योजनेंतर्गत आतापर्यंत ५८१ कोटी रुपयांहून अधिक महसूल महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा झाला असून, नागरिकांकडून मिळालेला प्रतिसाद पाहून नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार आयुक्तांच्या सुचनेनुसार १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे त्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घ्यावा असे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी सांगितले.

# स्टर्लिंग कॉलेज शिबिरात २४५ बाटल्या रक्तसंकलन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई भागातील नेरूळ स्थित एनसीआरडीज् स्टर्लिंग इन्स्टीटयुट ऑफ फार्मसीच्या एन.एस.एस. युनिट (एमडी ६८), लोकमान्य टिळक म्युनिसपल जनरल हॉस्पिटल व जसलोक हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर राबविण्यात आले. नेरूळ रेल्वे स्थानक व वाशी रेल्वेस्थानक येथे हा उपक्रम पार पडला. सदर रक्तदान शिबीरावेळी अअंदाजे २४५ बाटल्या रक्तसंकलन झाले. या कार्यक्रमास संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी अमरजित खराडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेश पिंगळे, शुभम भोईर, सचिन गोसावी व एनएसएस विद्यार्थी उपस्थित होते.




# पनवेल खाडीत सापडला २० किलोचा जिताडा मासा

## खवय्याने मोजले तब्बल २४ हजार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील खाडीत लावण्यात आलेल्या वाणा प्रकारच्या मासेमारीत कोल्ही कोपर येथील मत्स्यप्रेमींना हवाहवासा जिताडा मासा सापडला. कोपर गावातील गावातील संत्तेवान पाटील, चंद्रकांत म्हात्रे, पारगाव गावचे अंकुश गायकवाड पनवेल खाडीत मीलाला पिढ्यान पिढ्या मासेमारीचा धंदा करीत असून या मासेमारांना तब्बल २० किलो वजनाचा जिताडा मासा मिळाला. पनवेल तालुक्यातील पारगाव गावातील एका खवय्याने तब्बल २४ हजार रुपये मोजून हा मासा खरेदी केल्याची माहिती संत्तेवान पाटील यांनी दिली.



रायगड जिल्ह्यासह पनवेल तालुक्यात जिताडा मासा म्हणजे मासळीचा राजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिताडा ओळखले जाते. जिताडा प्रकारचा सर्वात मोठा २० किलोचा मासा पनवेलच्या कोल्ही-कोपर गावातील संत्तेवान पाटील, चंद्रकांत म्हात्रे, पारगाव गावचे अंकुश गायकवाड या मासेमारांना मिळाला आहे. खाडी किनारी सुमारे एक ते दोन किमीच्या परिघात काठ्या गाडून त्याला जाळे बांधले होते. आणि पूर्ण भरती झाल्यावर जाळे खाडीच्या बाजूने काठीच्या उंचीवर उभे केले होते. त्यामुळे जाळे आणि किनारा यांच्यामध्ये अडकलेली मासळी या वाणा प्रकारच्या खाजणी मासे पकडणीत मिळत असते. त्याचबरोबर पूर्वीच्या काळी तर पैशाने जी कामे होत नव्हती, ती या जिताडा माशाने अगदी जलद होत असायची.

# पाण्यासाठी गव्हाण ग्रामस्थांचा सिडको अधिकाऱ्यांना घेराव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**





पनवेल तालुक्यातील गव्हाण गावात गेल्या दहा दिवसांपासून सिडकोकडून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांच्या संतापाचा उद्रेक झाला. अखेर गुरुवारी गव्हाण ग्रामविकास कमिटीतर्फे सिडको कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला.

या आंदोलनात ग्रामस्थांनी एकमुखाने आपली नाराजी व्यक्त करत तत्काळ पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. या वेळी गव्हाण पंचायत समितीचे माजी सदस्य, ज्येष्ठ नेते आणि ग्रामविकास कमिटीचे सल्लागार भाऊशेठ पाटील तसेच ग्रामविकास कमिटीचे अध्यक्ष व भाजप नेते हेमंत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. यापूर्वीही ग्रामस्थांनी सिडकोच्या विरोधात आंदोलन करून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता, मात्र अद्याप समाधानकारक तोडगा निघाला नव्हता. गुरुवारीच्या घेरावानंतर अखेर अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करत त्याच दिवशी पाणीपुरवठा सुरळीत केला.

या संदर्भात बोलताना अध्यक्ष हेमंत ठाकूर म्हणाले, ग्रामविकास कमिटीच्या प्रयत्नांमुळे सिडको प्रशासन हलले असून गावाचा पाणीपुरवठा तत्काळ सुरू करण्यात आला आहे, मात्र कायमस्वरूपी तोडगा निघण्यासाठी गव्हाणसाठी स्वतंत्र नवीन पाईपलाईनची गरज आहे. या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी नवीन पाईपलाईनची मागणी अधिकाऱ्यांसमोर ठामपणे मांडली. सिडको अधिकाऱ्यांनी ही मागणी मान्य करत येत्या काही दिवसांत या कामाला सुरुवात केली जाईल, असे आश्वासन दिले.

या बैठकीस ग्रामविकास कमिटीचे उपाध्यक्ष सुनील कोळी, किरण देशमुख, प्रदीप ठाकूर, सल्लागार जयवंत देशमुख, सचिव मनोज कोळी, सल्लागार जे.बी. कोळी, सदस्य राजकिरण कोळी, पुरुषोत्तम देशमुख, निशा कोळी, कमलाकर कोळी यांच्यासह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामविकास कमिटीच्या एकजुटीमुळे गव्हाण ग्रामस्थांना तातडीने दिलासा मिळाल्याने समाधान व्यक्त केले जात आहे तसेच आगामी काळात गावाचा कायमस्वरूपी पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचा निर्धार ग्रामविकास कमिटीने व्यक्त केला आहे.

# विचुंबे येथे गृहिणींना ‘उमेद’सारखे व्यासपीठ उपलब्ध –आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



छत्रपती महिला ग्रामसंघ व आदिशक्ती अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्य गृहिणींना, त्याच्या उद्योजकतेला वाव देणारे ‘उमेद’सारखे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी केले.

छत्रपती महिला ग्रामसंघ आणि आदिशक्ती अभियान, विचुंबे यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर खास प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १७) झाले. महिला उद्योजिकांना त्यांच्या उत्पादनांसाठी हक्काची बाजारपेठ आणि त्यांच्या व्यवसायाला नवीन ग्राहक मिळवून देण्याच्या उद्देशाने हे प्रर्दशन विचुंबे येथील विठ्ठल रखुमाई मैदान येथे भरवण्यात आले असून १७ ते १९ ऑक्टोबरदरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू असणार आहे.

या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, भाजपचे अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तालुका चिटणीस यतिन पाटील, अविनाश गायकवाड, हिरामण चिमणे, भरत पाटील, बळीराम पाटील, के.सी. पाटील, अनिल भोईर, प्रमिला म्हात्रे, श्रावणी भोईर, स्वाती सालेकर, मनाली म्हात्रे, स्वप्ना साखरे, सायली कांबळे, गुरुनाथ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

प्रदर्शनात विविध प्रकारचे चविष्ट पदार्थ, दिवाळीसाठी आवश्यक असलेला घरगुती आणि पारंपरिक फराळ, आकर्षक आणि नवीन डिझाईनचे कपडे, सुंदर दागिने, दिवाळीसाठी लागणारे सजावटीचे साहित्य, पर्यावरणपूरक आणि टिकाऊ कापडी पिशव्या उपलब्ध आहेत.



# सानुग्रह अनुदानाबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर यांचे आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


पनवेल महानगरपालिकेतील कामगार, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी यंदाची दिवाळी भरघोस सानुग्रह अनुदान मिळाल्याने आनंददायी ठरणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांना यश आले असून १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या पनवेल महापालिकेच्या महासभेत ३२ हजार रुपयांचा सानुग्रह अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

ही मोठी रक्कम मिळवून देण्यासाठी पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी विशेष प्रयत्न केल्याबद्दल म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनने त्यांचे तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे आभार मानले आहे.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, कार्यालय प्रमुख महेंद्र गायकवाड, संजय जाधव, विश्राम म्हात्रे, निलेश म्हात्रे, प्रफुल्ल घरत, संदीप पवार, रवींद्र गायकवाड, मनोज कांबळे, सिध्देश म्हात्रे आदी उपस्थित होते.



# खारघरमध्ये स्तन कर्करोग जागरूकता शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

महिलांच्या आरोग्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम म्हणून खारघर येथील स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू यांच्या वतीने स्तन कर्करोग जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात महिलांना तब्बल हजार रुपये किमतीच्या तपासण्या पूर्णपणे मोफत उपलब्ध असणार आहेत. या शिबिराच्या पोस्टर्सचे अनावरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले.

स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि आयसीयू यांनी मोठी मोहिम सुरू केली आहे. त्याबद्दल स्पंदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे आभार मानले तसेच महिलांनी या शिबिराला भेट देऊन लाभ घ्यावा, असे आवाहन केले. अर्ली डिटेक्शन सेव्हस लाइव्हस या संदेशावर आधारित हा उपक्रम ३१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत खारघर येथील स्पंदन हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आला आहे. या शिबिरात सहभागी महिलांना दोन महत्त्वाच्या आरोग्य सुविधांचा लाभ विनामूल्य घेता येणार आहे.

महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यावेळी भाजप अनुसूचित जाती मोर्च्याचे जिल्हा अध्यक्ष अमित जाधव, शहानवाज़ सैय्यद, डॉ. मुबश्शिर, संजय चव्हाण, तबस्सुम शेख उपस्थित होते.

# तक्का येथे फिरत्या दवाखान्याचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



वेळेवर उपचार सुरू झाले तर आरोग्य तंदुरुस्त राहते असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी तक्का येथे फिरत्या दवाखान्याच्या उद्घाटनावेळी केले. तसेच युवा नेते प्रतिक बहिरा यांनी हा उपक्रम राबवून नागरिकांना दिवाळीनिमीत्त ही भेट दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा या उदात्त भावनेतून तक्का येथे शुक्रवारी फिरत्या डिजिटल दवाखान्यामार्फत भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या स्तुत्य उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

तक्का येथील मराठा शाळेच्या आवारात पुढील तीन दिवस सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे. आरोग्य आपल्या दारी या संकल्पनेतून सुरू झालेल्या या शिबिरात नागरिकांसाठी संपूर्ण शरीर तपासणीसह विशेष तपासण्या करण्यात आल्या. फिरत्या डिजिटल दवाखान्याच्या माध्यमातून सर्व अत्याधुनिक सुविधा नागरिकांच्या दारापर्यंत पोहचवल्या गेल्याने, विशेषतः वृद्ध आणि गरजू नागरिकांसाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले.

या वेळी भाजप नेते जयंत पगडे, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, संदीप बहिरा, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, शहर महिला उपाध्यक्ष मनीषा बहिरा, शहर उपाध्यक्ष प्रशांत शेटे, अजय कांडपिळे, गौरव कांडपिळे, अभिषेक पटवर्धन, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष हिमेश बहिरा, अतुल बहिरा, रोशन कोळी, पार्थ बहिरा, अक्षय भगत, भारत बहिरा, रोहित शिवकर, जगदीश परदेशी, शंकर शेठ म्हात्रे, विपुल मुंबईकर, कृशाल बहिरा, निलेश बहिरा, किरण बहिरा, महेश राऊळ यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. हा यशस्वी उपक्रम भाजप युवा नेते प्रतीक बहिरा आणि श्री युवा प्रतिष्ठानंच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे.

# कळंबोलीतील ‘उबाठा’चे कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठा धक्का बसला असून अनेक महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाचे विकासाचे ‘कमळ’ हाती घेतले आहे. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजप परिवारात स्वागत करून त्यांनी जो विश्वास ठेवून पक्षप्रवेश केला आहे तो सार्थ ठरेल, अशी ग्वाही दिली.

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांचा झंझावात सुरू आहे. त्यांच्या सक्षम नेतृत्वावर आणि कार्यप्रणालीवर विश्वास ठेऊन अनेक पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते भाजपमध्ये सामील होत आहेत. त्यानुसार कळंबोलीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर समन्वयक दिपक शिंदे, दिपक गोरे, शहर संपर्क संघटिका रत्नमाला शिंदे, विभाग प्रमुख उन्नती गोरे, साधना खांडेकर, शाखा संघटिका अर्चना डावरे, आशा गायकवाड, मनीषा दुबके, धनश्री खांडेकर, सीमा जाधव, माधुरी मदने, दीपा पाठक, माया मोरे, अनिता भंडारे, अधिता वर्णेकर, वंदना पवार, मनीषा देसाई, रोहिणी विभुते, दीपाली गायकवाड, पल्लवी जगताप, सुहासिनी राजबर तसेच शिवशक्ती घर मालक संघटना सोसायटीमधील रूपा देवी, शिला देवी, हिरा झा, ममता देवी, गायली देवी, रीना राऊत, चिंन्ता देवी, किरन जैशवाल, वनिता गरड, रुबी मोहिते, आशा जाधव, रुपाली सोनवणे यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, अनुसुचीत जाती मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अमित जाधव, महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षा प्रिया मुकादम आदी उपस्थित होते.




## संपादकीय

# गोंधळलेले विरोधक

मतदारयाद्यांमधील तपशीलांचे गोंधळ ही अनेक वर्षांपासूनची समस्या आहे, परंतु त्याविरोधात कांगावाखोर ओरड करून विरोधक निवडणुका पुढे ढकलण्याचा प्रयत्न करीत आहेत. संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याच्या विरोधकांच्या या कारनाम्यांवर बोट ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'इतके गोंधळलेले विरोधक मी आयुष्यात पाहिले नाहीत' असे समर्पक उद्गार काढले आहेत.

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी नुकताच मतदार याद्यांमधील त्रुटींच्या मुद्यावरून कांगावा केला. उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्याकडे तर मुंबई महापालिका निवडणुकांसाठी मुंबईकरांसमोर जाताना कोणताच मुद्दा नाही. तसा राज्यातील महापालिका निवडणुकांना अद्याप काही महिन्यांचा अवकाश आहे, पण सोन्याचे अंडे देणारी कोंबडी अशी उपमा जिला दिली जाते, ती मुंबई महापालिका काही केल्या आपल्या हाती आता लागणार नाही याच्या धास्तीने उबाठा गटाच्या नेतेमंडळींना ग्रासलेले दिसते. तीसएक वर्षांचा प्रदीर्घ काळ मुंबईची सत्ता हातात असून या पक्षाकडे मुंबईकरांसमोर जाताना अभिमानाने सांगावे असे कोणतेही काम नाही. मग ते दुसरे करणार तरी काय? महाविकास आघाडीच्या अन्य नेत्यांना सोबत घेत त्यांनी नुकतेच निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना घेरले. मतदार याद्यांमध्ये दोष असल्याचा कांगावा या नेतेमंडळींनी केला. आयोगाने हे दोष स्वत:हून दूर करावेत आणि तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत अशी मागणी 'मविआ'च्या नेतेमंडळींनी केली. याखेपेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनाही निवडणूक आयोगाच्या विरोधातील या कांगाव्यात सामील झाली. ही नेतेमंडळी म्हणे निवडणूक आयोगाच्या प्रतिसादानंतर पुढील 'रणनीती' ठरवणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेमक्या शब्दांत विरोधकांच्या केविलवाण्या कारवायांचे वर्णन केले. राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर विरोधीपक्षांनी सत्ताधारी महायुती आणि निवडणूक आयोगावर केलेली ही टीका म्हणजे 'वातावरणनिर्मितीचा प्रयत्न' असल्याचे फडणवीस यांनी म्हटले. विरोधीपक्षाची ही नेतेमंडळी लोकशाहीच्या रक्षणासाठी एकत्र आल्याचा दावा करतात. 'आयोगाच्या प्रतिसादानंतर चुकांचे आणखी पुरावे देऊ' असा इशाराही विरोधकांनी दिला आहे. म्हणजे गेले काही महिने लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी ज्या प्रमाणे हायड्रोजन बॉम्बची धमकी देत आहेत तसेच हे दिसते. महायुती सरकारच्या भरीव कामगिरीपुढे आपला निभाव लागणार नाही हे स्पष्ट दिसत असल्यानेच विरोधकांनी ही नकारात्मक ओरड सुरू केली आहे. एकीकडे महायुतीची विकासकामे आहेत तर दुसरीकडे कुठलाच ठोस मुद्दा हाती नसलेले विरोधक. आता तर विरोधक मतदानपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची मागणी करत आहेत. एकीकडे जनता मुंबईतील नवी भुयारी मेट्रो, कोस्टल रोड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अटलसेतू यांसारख्या नजरेत भरणाऱ्या प्रकल्पांमुळे हरखली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील जनतेचा विश्वास आजही तितकाच दृढ आहे. मोदी सरकारच्या पाठबळाने राज्यातील महायुतीचे सरकारही दमदार वाटचाल करीत आहे हे जनता जाणते. विरोधक मात्र देशपातळीवर असो की राज्य पातळीवर ईव्हीएमच्या नावाने खोटी ओरड करण्याखेरीज दुसरे काही करताना दिसत नाहीत. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात मविआला थोडेफार यश हाती लागले. तेव्हा त्यांनी ईव्हीएमबद्दल सोयीस्कर मौन पाळले. नंतर विधानसभा निवडणुकीत मात्र मतदारांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली. तेव्हापासून ते पुन्हा ईव्हीएमच्या नावाने कांगावा करू लागले. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी काही मुद्दाच नसल्याने विरोधक गोंधळून गेलेले दिसतात.**

# दीपावलीतील धनत्रयोदशीचे महत्त्व



धनत्रयोदशी किंवा धनतेरस हा दिवाळीचा दुसरा दिवस आहे,१ जो नेपाळ आणि भारतात साजरा केला जातो. धनत्रयोदशी ही आश्विन महिन्याच्या १३ व्या दिवशी असते.

धनत्रयोदशीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की, धनत्रयोदशीला लक्ष्मीची पूजा केल्याने घरात धन, सुख आणि समृद्धी येते. यासोबतच संपत्तीचा देव कुबेर यांचीही पूजा या दिवशी केली जाते. हिंदू मान्यतेनुसार, भगवान विष्णूचा अवतार भगवान धन्वंतरी यांचा जन्म धनत्रयोदशीच्या दिवशी झाला होता. त्याची पूजाही केली जाते.

यादिवशी धन्वंतरी पूजन केले जाते. हिंदू परंपरेनुसार आरोग्याची देवता धन्वंतरी, समुद्र मंथनाच्या वेळी प्रकट झाले.२ ही देवता चतुर्भुज असून याच्या हातात, क्रमशः शंख, चक्र, अमृताचा कलश आणि जळू असतो.३ तो देवांचा वैद्य मानला जातो. धन्वंतरी हा विष्णूचा अवतार देखील मानला जातो.


**धन्वंतरी देवता धनत्रयोदशी कथा**

धनत्रयोदशी या सणामागे एक प्रचलित कथा आहे. इंद्राने जेव्हा असुरांना बरोबर घेऊन समुद्रमंथन केले, तेव्हा त्यातून चौदा रत्ने प्रगट झाली, त्यापैकी एक धन्वंतरी देवता आहे. म्हणून या दिवसास धन्वंतरी जयंती असेही म्हणतात. यामुळे यादिवशी प्रामुख्याने धन्वंतरीपूजन केले जाते.

याच सोबत अजून एक कथा अशी सांगितली जाते की, कथित भविष्यवाणी प्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपल्या पुत्राने जीवनाची सर्व सुख उपभोगावीत म्हणुन राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चवथा दिवस हा तो मृत्युमुखी पडण्याचा भयंकर दिवस असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वार ही असेच सोन्या चांदीने भरून रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. ती त्यास वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून जागे ठेवते. जेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परूपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा त्याचे डोळे सोन्या चांदीने दिपतात. या कारणास्तव यम आपल्या जगात(यमलोकात) परततो. अशा प्रकारे तिने राजकुमाराचे प्राण वाचवले. म्हणूनच या दिवसास 'यमदीपदान' असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात.त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यू टळतो असा समज आहे.

**(साभार : इंटरनेट)**

# भारतीय कवी आणि लेखक विश्वनाथ सत्यनारायण



विश्वनाथ सत्यनारायण सुप्रसिद्ध तेलुगू साहित्यिक. ते ओजस्वी आणि शास्त्रीय दृष्टीने संपन्न असे कवी, कादंबरीकार, नाटककार, समीक्षक आणि निबंध लेखक आहेत. त्यांनी तेलगु साहित्यात आपले असे एक विशिष्ट स्थान निर्माण केलेले आहे. त्यांचा जन्म नन्दनूर, जिल्हा कृष्णा, आंध्रप्रदेश इथे झाला होता. आईवडिलांकडून त्यांना वारसाहक्काने केवळ ईश्वरभक्ती मिळाली. विश्वनाथ सत्यनारायण यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्तचा लेख...

लहानपणी त्यांना नन्दनूरपासून ४० मैल दूरवर असलेल्या मछलीपट्टनम या गावी एका इंग्रजी शाळेत घातले होते. त्या शाळेत प्रसिद्ध तेलुगू कवी चेल्लपिल्ल वेंकटशास्त्री हे तेलुगूविषयाचे शिक्षक होते. त्यांच्या प्रेरणेनेच विश्वनाथ सत्यनारायण यांनी साहित्यक्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला होता. हायस्कूलमध्ये शिकत असतानाच विश्वनाथ सत्यनारायण यांनी तेलुगू, इंग्रजी आणि संस्कृत या भाषांवर प्रभुत्व संपादन करून तेलुगू आणि संस्कृतमध्ये काव्य लेखनही केले होते. १९१९ मध्ये त्यांनी पदवी संपादन केली. मछलीपट्टनम् नॅशनल कॉलेजमध्ये तेलुगू भाषेचे अध्यापन (१९२०-२६), मग गुंटूर डिग्री कॉलेजमध्ये अध्यापन केले. पुढे त्यांनी प्राध्यापकी केली. पण स्वतंत्र वृत्तीमुळे ते स्वतःला नोकरीच्या बंधनात बांधून घेऊ शकले नाहीत. त्यांची नोकरी काही काळातच सुटली आणि त्याच काळात त्यांच्या पत्नीचाही स्वर्गवास झाला होता.

विश्वनाथ सत्यनारायण यांच्या १०० पेक्षा जास्त साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्यात ६० कादंबऱ्या, २० काव्यसंग्रह, चार गीतिकाव्य, १३ नाटके, सात समीक्षाग्रंथ यांचा समावेश आहे. त्यांच्या सुरुवातीच्या कवितांमध्ये सौंदर्य, प्रेम आणि भक्तीचा संगम झालेला दिसतो. तारुण्यात पदार्पण करताच गिरीशकुमार यांची प्रेमगीते त्यांच्या लेखणीतून उतरली होती. आणि पुढे जाऊन शृंगारवीथि हा त्यांच्या काव्यसंग्रह देखील प्रकाशित झाला होता. पण विश्वनाथ सत्यनारायण यांचे प्रेम वासनेने कलुषित नव्हते. तर धार्मिक भावनेने ओतप्रोत भरलेले होते. प्रेम आणि भक्ती या दोन्ही भावनांनी त्यांची कविता ओतप्रोत होती.

नोकरी सुटल्यानंतरच्या काळात रामायण कल्पवृक्षमु या महाकाव्याचे बीज त्यांच्या मनांत रुजले होते. त्यांचे वडील त्यांना म्हणाले होते की, जगात सगळ्यात सुंदर आणि रोचक कहाणी भगवान रामाचीच आहे. बाकी कथा ह्या अन्नवस्त्राच्या कथा आहेत. जीवनातील रिक्त क्षणी रामकथेला काव्यरूप देण्याचा विचार विश्वनाथ यांच्या मनांत आला. जन्मजन्मांतरीचे संस्कार आणि जन्मजात वेदना बरोबर घेवून रामायण कल्पवृक्षमुची रचना करायला त्यांनी सुरुवात केली. ती रचना करायला त्यांना ३० वर्ष लागली. १९७० मध्ये भारतीय ज्ञानपीठद्वारा पुरस्कृत त्यांची ही रचना वाल्मिकी रामायणाप्रमाणे एक गंभीर, प्रौढ अशी रचना आहे. केवळ आशयाच्या दृष्टीनेच नव्हे, तर महानतेच्या दृष्टीनेही त्यांची रचना मूळ काव्याजवळ पोहोचते. कल्पवृक्षमुचे कथानक ६ खंडात विभागलेले आहे. उत्तरखंड त्यात नाही. रामायणात जी नावे आहेत ती नावे त्याना इतर कांडांना (विभागांना) दिली आहेत. त्यांनी प्रत्येक विभागाचे ५ भागात विभाजन केले आहे. उदाहरणार्थ बालकांडात इष्टी, अवतार, अहल्या, धनु आणि कल्याण या शीर्षकाचे ६ उपविभाग आढळतात. या प्रकारे अयोध्याकांड देखील ५ उपविभागात विभागलेले आहे. अभिषेक, प्रस्थान, मुनिशाप, पादुका आणि अनुसया हे ते पाच विभाग आहेत. अरण्यकांडात दशवर्ण, पंचवटी, मारीच, जटायू, आणि शबरी असे पाच उपविभाग आहेत.

त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. वेयिपंगुल (कादंबरी) साठी त्यांना आंध्र विश्वविद्यालय पुरस्कार (१९३८, हिंदी अनुवाद सहस्त्रफणा या शीर्षकाने भारताचे माजी पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी केला), महाकाव्य श्री रामायण कल्पवृक्षमु या महाकाव्यासाठी त्याना भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार (१९७१), मध्यक्करलु या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमी पुरस्कार, तेलुगू साहित्य समाजाचा कवीसम्राट सन्मान, साहित्य अकादमी फेलोशीप, पद्मभूषण (१९७१) इत्यादी पुरस्कारांचा त्यात समावेश होतो. विधानसभेचे सदस्यत्वही त्यांनी भूषवले आहे.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

## बदलते तंत्रज्ञान

# दिवाळीनिमित्त गुगल वनने आणली जबरदस्त ऑफर

दिवाळीनिम्मित इ-कॉमर्स वेबसाईटवर एकशे पेक्षा एक ऑफर सुरू आहे. मोबाइल, कपडे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आदी. अश्या अनेक वस्तूंवर ऑफर सुरू आहे. दिवाळी म्हंटल तर फोटो स्टोरेजचा प्रॉब्लेम येतो. आता फोटो आणि डेटा साठवण सोपं होणार आहे. गुगलने दिवाळी निम्मित आपल्या युजर्ससाठी एक जबरदस्त ऑफर आणला आहे. हा ऑफर केवळ काही काळ पर्यंत ठराविक आहे. ज्यात Google जपश स्टोरेज प्लॅन खूप स्वस्त किमतीत उपलब्ध आहे.




दरवर्षी सणासुदीचा काळ येतो तेव्हा, गुगल आपल्या लाखो वापरकर्त्यांसाठी खास ऑफर घेऊन येते. यावेळीही कंपनीने एक खास ऑफर जाहीर केली आहे. जी तुम्हाला या दिवाळीत स्टोरेजची काळजी करण्याची गरज नाही याची खात्री करेल. कंपनी केवळ ११ रुपयांमध्ये गुगल ड्राइव्हमध्ये अतिरिक्त स्टोरेज देत आहे.

किती दिवसांसाठी हा ऑफर : खरं तर, दिवाळीच्या काळात, जेव्हा प्रत्येकजण खूप फोटो काढत असतो, तेव्हा स्वस्त आणि अतिरिक्त स्टोरेज हे एक वरदान आहे. हेच लक्षात घेत गुगलने हा ऑफर आणला आहे. गुगलची ऑफर मर्यादित आहे आणि सर्व प्लॅन पहिल्या तीन महिन्यांसाठी फक्त ११ मध्ये उपलब्ध आहेत.

Google One स्टोरेज मासिक प्लॅनच्या किमती

Lite 30GB प्लान: पहिल्या तीन महिन्यांसाठी ११, त्यानंतर ५९/महिना, Basic 100GB प्लान: पहिल्या तीन महिन्यांसाठी ११, त्यानंतर १३०/महिना, Standard 200GB प्लान: पहिल्या तीन महिन्यांसाठी ११, त्यानंतर २१०/महिना, Premium 2TB प्लान: पहिल्या तीन महिन्यांसाठी ११, त्यानंतर ६५०/महिना

दिवाळीसाठी फक्त काही दिवस शिल्लक आहेत, आपण सणासुदीच्या निम्मिताने खूप फोटो काढतो की कधी कधी डेटा वाचवण्यासाठी आमच्याकडे जागा संपते. दरम्यान, ही स्वस्त गुगल ड्राइव्ह स्टोरेज ऑफर खूप फायदेशीर ठरू शकते.

Flipkart च्या Big Bang Diwali सुरु झाला आहे. या सेलमध्ये Realme P4 Pro 5G स्मार्टफोनवर मोठी सवलत मिळत आहे. अलीकडेच लॉन्च झालेला हा फोन आता फेस्टिव्हल सेलमध्ये कमी किमतीत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

# कायदेपंडित, लेखक चिंतामणराव वैद्य



## निमित्त

भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांचा जन्म १८ ऑक्टोबर, इ.स. १८६१ मध्ये झाला. हे संस्कृत भाषेतील विद्वान होते. त्यांनी अनेक माहितीप्रचुर पुस्तके लिहिली. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे त्यांनी रामायण-महाभारतासारख्या पौराणिक इतिहासाच्या अनेक अपरिचित भागांवर प्रकाश टाकला.

चिंतामणराव वैद्यांचे वडील विनायकराव हे कल्याणला वकिली करीत. चिंतामणरावांचे शिक्षण कल्याण तसेच मुंबईच्या एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेजात झाले. इ.स. १८८२त एम.ए. आणि १८८४मध्ये एल्एल.बी. झाल्यानंतर त्यांनी काही काळ कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथे मुनसफ म्हणून व नंतर ठाण्याच्या कोर्टात वकील म्हणून काम केले. त्यानंतर ते उज्जैन येथे न्यायाधीश पदावर रुजू झाले. पुढे १८९५मध्ये ग्वाल्हेर संस्थानच्या सरन्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. सेवानिवृत्तीनंतर ते १९०५ सालापासून लोकमान्य टिळकांचे सहकारी म्हणून काम करू लागले. राष्ट्रीय शिक्षणाचे काम त्यांनी आस्थेने व निष्ठेने केले. कोलकाता, सुरत आदी काँग्रेस अधिवेशनांना ते टिळकांबरोबर गेले. टिळकांच्या पश्चात वैद्यांनी महात्मा गांधीजींचा मार्ग अनुसरला. वेगवेगळ्या समित्यांवर काम करणे, अहवाल लिहिणे ही कामे त्यांनी गांधींच्या मार्गदर्शनाखाली केली.


वैद्य हे पुणे येथे टिळक महाविद्यालयात व्याख्याते होते. चि.वि. वैद्यांनी १८८९ ते १९३४ या काळात सुमारे ५०,००० पृष्ठे इतके लेखन इंग्रजी-मराठीत केले. त्यांचे स्फुटलेखन केसरी, विविधज्ञानविस्तार, इंदुप्रकाश, नेटिव्ह ओपिनियन आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. यांपैकी फारच थोडे लेखन ग्रंथरूपात आले. त्यांचे एकूण २९ ग्रंथ प्रकाशित झाले, पैकी नऊ ग्रंथ इंग्रजीत आणि २० मराठीत होते.

चिं.वि. वैद्यांच्या 'महाभारत ए क्रिटिसिझम या इंग्रजी ग्रंथावर लोकमान्य टिळकांनी केसरीतून सलग आठ अग्रलेख लिहून परीक्षण केले व ग्रंथांची मौलिकता दाखविली. त्यानंतर टिळकांनी आणखी एक अग्रलेख लिहून रिडल ऑफ रामायण या ग्रंथाचे परीक्षण केले. रामायण व महाभारत ही कल्पित काव्ये नसून ते इतिहासाचे ग्रंथ आहेत, या आपल्या विश्वासाला वैद्यांकडून व्यासंगपूर्ण समप्रमाण पुष्टी मिळाल्याबद्दल लोकमान्यांनी आपल्या अग्रलेखात (६ जुलै१९०६) समाधान व्यक्त केले आहे. वैद्यांनी महाभारताच्या संदर्भात एपिक इंडिया व श्रीकृष्ण चरित्र हे ग्रंथ लिहिले.

मानवधर्मसार व हिंदू धर्माची तत्त्वे या दोन पुस्तिकांतून वैद्यांचे हिंदुधर्मविषयक विचार व्यक्त झाले आहेत. त्यांच्या या पुस्तकांतून ईश्वर, सैतान, स्वर्ग आणि नरक, ग्रंथप्रामाण्य, चमत्कार, मूर्तिपूजा, आश्रमव्यवस्था इ. विषयांसंबंधी चिकित्सा केलेली आहे.

वैद्यांनी प्राचीन व मध्ययुगीन भारतीय इतिहासावर विविधांगी व प्रचंड संशोधन करून ग्रंथलेखन केले. त्यांपैकी 'हिस्टरी ऑफ मिडिव्हल हिंदू इंडिया' या ग्रंथाचे तीन खंड त्यांनी प्रथम इंग्रजीत लिहिले. आणि त्यानंतर त्याचा तीन-खंडी मराठी अनुवाद 'मध्ययुगीन भारत' या नावाने प्रसिद्ध केला. याशिवाय 'गझनीच्या महमूदाच्या स्वाऱ्या' आणि 'शिवाजी द फाउंडर ऑफ मराठा स्वराज' हे त्यांचे दोन अन्य इतिहासविषक ग्रंथ होत. **(साभार : विकिपीडिया)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुमचं वय कितीही असूदे, हे व्यायाम केलेच पाहिजेत

सध्याच्या धावपळीच्या जगात फिट राहणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे प्रत्येक जण फिट राहण्यासाठी नेहमी काही ना काही उपाय करताना दिसतं. मग वय कोणताही असो वृद्ध लोक असो तरुण मुलं असो फिट राहण्यासाठी ते नेहमी काही ना काही प्रयत्न करत असतात. मग आहार असो किंवा व्यायाम किंवा जिमला जाणं असो असे अनेक वेगवेगळे उपाय लोक करत असतात. त्यात फिट राहण्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात व्यायाम करताना दिसतात. व्यायाम केल्यामुळे आपली हाडे मजबूत राहतात, आपली प्रतिकार शक्ती सुधारते आणि आपले हृदय देखील निरोगी राहते तसेच आपले मानसिक आरोग्य देखील चांगले राहते.



Hindu Squats हा व्यायाम आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरतो. तुम्ही तुमची हाडे मजबूत ठेवण्यासाठी तसेच तुमचे स्नायू निरोगी राहण्यासाठी Hindu Squat करू शकता. हा व्यायाम केल्यामुळे तुमचे शरीर लवचिक होते तसेच तुमच्या शरीरातील ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते.

प्रत्येकाने दररोज श्वासोच्छवासाचा व्यायाम करणे गरजेचे आहे. हा व्यायाम केल्यामुळे आपल्या फुफ्फुसांसाठी फायदेशीर ठरते. तसेच हा व्यायाम केल्यामुळे तुमचे फुफुसाचे कार्य सुधारते आणि ते मजबूत राहण्यास मदत होते. श्वासोच्छवासावामुळे आपल्या रक्ताभिसरणाला गती मिळते तसेच आपले मानसिक आरोग्य देखील निरोगी राहते.

प्रत्येकाने दररोज सकाळी जॉगिंग करणे गरजेचे आहे. ज्यांना लठ्ठपणाची समस्या आहे तसेच ज्यांना फिट राहायचंय अशांनी जॉगिंग करणं गरजेचं आहे. जॉगिंग केल्यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. तसेच तुमची रोगप्रतिकार शक्ती देखील मजबूत होते. तुमच्या शरीराची लवचिकता देखील टिकून राहण्यास मदत होते. त्यामुळे तुमचे वय कितीही असलं तरी जॉगिंग केल्यामुळे तुमचा फिटनेस कायम राहतो.

स्ट्रेचिंग केल्यामुळे तुमचे शरीर लवचिक राहण्यास मदत होते. तसेच तुमचे हाडे मजबूत होतात, स्नायू वरील ताण कमी होण्यास मदत होते. तसेच स्ट्रेचिंगमुळे शरीरातील वेदना देखील कमी होण्यास मदत होते. स्ट्रेचिंगमुळे आपल्या शरीरातील स्टॅमिना वाढण्यास मदत होते त्यामुळे स्ट्रेचिंग करणे शरीरासाठी खूप फायदेशीर ठरते. प्रत्येकाने दररोज वेगाने चालण्याचा व्यायाम केला पाहिजे. हा व्यायाम केल्यामुळे तुमचे हृदय निरोगी राहण्यास मदत होते. नियमितपणे चालल्यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.

# वादळी पावसामुळे कर्जत, माणगावमध्ये बत्ती गुल

## कर्जत तालुक्यात वादळासह पावसाचे थैमान, विजेचे खांब कोसळल्याने अंधार



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास अचानक चक्री वादळासह पावसाने सुरुवात केली. सरत्या पावसाने ऐन दिवाळी सणाच्या सुरुवातीलाच जनजीवन विस्कळीत करून टाकले. या पावसाने अनेक ठिकाणी वीजेचे खांब कोसळल्याने विज पुरवठा खंडित झाला.

यामुळे पाणीपुरवठा योजनांवर परिणाम होऊन कर्जत शहरासह अन्य ग्रामीण भागातील पाणी पुरवठा विजेअभावी बंद पडला. त्यामुळे बहुतांश भागातील जनतेला आज पाण्याविना राहावे लागले.

कर्जत तालुक्यातील कडाव, कशेळे आणि खांडस परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने सुरुवात केली. कडाव परिसरात चक्री वादळासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. कडाव नजिकच्या कळंबोळी वीज उपकेंद्रातून तालुक्यातील विविध भागात वीज पुरवठा केला जातो. वादळी पावसामुळे उपकेंद्रातून विविध भागात वीज पुरवठा करणारे वीजेचे अनेक खांब कोसळले तसेच झाडेही कोसळली. त्यामुळे तालुक्याच्या ग्रामीण भागातील वीज पुरवठा बंद झाला.

अनेक पाणी पुरवठा योजनांचा उदभव याच परिसरात असल्याने कर्जत शहरासह अनेक पाणी पुरवठा योजना बंद पडल्याने ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर नागरिकांना व ग्रामीण भागातील ग्रामस्थांना पाण्याविना राहावे लागले. कर्जत शहरातील वीज पुरवठा खोपोली येथून घेण्यात आल्याने शहरातील वीज पुरवठा सुरु झाला मात्र ग्रामीण भाग अंधारातच होता. वीज पुरवठा सुरु करण्यासाठी महावितरण कडून शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. कर्जत शहरालाही पावसाने झोडपल्यामुळे फटाके, कंदील, रांगोळी विक्रेत्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे.

## माणगाव जांभूळवाडीत झाड पडून वीजपुरवठा खंडित

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यतबुधवारी सकाळपासूनच नेहमीपेक्षा वातावरणात बदल होऊन गरमी जाणवत होती. आकाशात हळूहळू ढग जमा होत होते. तसेच सायंकाळी सहा ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास वादळ वारा व मेघगर्जनेसह अवकाळी पावसाने झोडपून काढले.

अवकाळी मेघ गर्जनेसह आलेल्या तुफान वादळी पावसाने पूर्व विभागातील जनजीवन विस्कळीत केले. तसेच जांभूळवाडी येथे भले मोठे झाड या वाऱ्यासह आलेल्या पावसामध्ये भर रस्त्यावर विजेच्या तारेवर पडल्याने साधारण अर्धा ते एक तास वाहतूक ठप्प झाली होती. परंतु एवढ्या वेळेमध्ये कोणीही पादचारी अथवा वाहन नं आल्याने अनर्थ टळला. येथील ग्रामस्थांनी ताबडतोब पडलेले झाड तोडून वाहतूकीला रस्ता मोकळा करून दिला. ही माहिती वायरमन यांना समजली असता कार्यकारी अभियंता मयूर भंगाले यांच्या आदेशानुसार वायरमन नितीन धसाडे, रमेश गायकवाड, आकाश जाधव, लाईन मन वाघे काका तसेच जांभूळवाडी येथील सर्व ग्रामस्थ यांनी रात्री सात वाजल्यापासून नऊ वाजेपर्यंत भर पावसामध्ये जीवाची पर्वा न करता मेहनत घेऊन लाईट चालू केली त्यामुळे आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थानी त्यांचे आभार मानले.

अचानक आलेल्या या तुफान वादळी वाऱ्यासह पावसाने संपूर्ण पूर्व विभाग झोडपून काढला. या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. सतत आठ ते दहा दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने शेतकरी राजाने कापलेल्या भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. शेतकऱ्यांच्या भातशेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी असे नुकसानग्रस्त शेतकरी बोलत आहेत.

## जिंदल विद्यामंदिरात फिरते विज्ञान प्रदर्शन

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई आणि जेएसडब्ल्यू प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने फिरती विज्ञान प्रदर्शनी दिनांक १० ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली. आरोग्य, स्वच्छता आणि स्वच्छतागृहे या विषयावर आधारित असलेल्या या उपक्रमाने शाळा परिसरात ज्ञानाची आणि जिज्ञासेची लहर निर्माण केली.



या प्रदर्शनीमध्ये नर्सरीपासून ते बारावीपर्यंतच्या आठशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना विविध हाताळून पाहता येणारी उपकरणे, थेट प्रयोग, आणि आकर्षक प्रात्यक्षिकांद्वारे विज्ञान समजावून देण्यात आले.

हवेचा दाब, गुरुत्वाकर्षणाचा केंद्रबिंदू, घूर्णन बल, आणि पाण्याच्या रॉकेटचा प्रयोग यांसारखे विषय विद्यार्थ्यांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे आणि आश्चर्याचे भाव पाहूनच हे सिद्ध झाले की विज्ञान शिकणे हे रुक्ष नसून रंजकही असू शकते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली, तसेच विज्ञान विषयाबाबत प्रेम निर्माण झाले.

प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी या उपक्रमाचे मन:पूर्वक स्वागत करत नेहरू विज्ञान केंद्राच्या चमूचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी प्रयोग करून शिकलं पाहिजे, तरच त्यांना विज्ञानातील अमर्याद शक्यता समजतील, असे ते म्हणाले.

## खालापूर पोलीस वसाहत पडीक अवस्थेत

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेली पोलीस कर्मचारी वसाहत भयाण अवस्थेत असून ,सध्या या ठिकाणी विंचू आणि सापाचा वावर वाढला आहे. खालापूर तालुका पोलीस ठाणे लगतच पोलीस वसाहत आहे. या ठिकाणी तीन इमारती मधून जवळपास चोवीस खोल्या आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबाचा सहवास मिळावा तसेच कर्तव्यावर जाताना सोयीचं व्हावे यासाठी पोलीस ठाणे लगतच पोलीस वसाहत इमारत आहे.

परंतु खालापूर तालुक्याचे ठिकाण असताना देखील या ठिकाणी असणाऱ्या अपुऱ्या सोयी सुविधा यामुळे पोलीस कर्मचाऱ्यानी वसाहतीकडे पाठ फिरवली आहे. खालापूर शहरात दोन ते तीन दिवसा आड येणारे अशुद्ध पाणी, शैक्षणिक तसेच आरोग्यसेवा याची कमतरता यामुळे पोलीस कर्मचारी या ठिकाणी राहण्यास नाखुश आहेत. सात ते आठ वर्षांपासून पोलीस वसाहत पडीक अवस्थेत आहे.

या ठिकाणी नोकरीसाठी असलेले कर्मचारी खोपोली ,पनवेल तसेच पेण या ठिकाणी राहण्यासाठी प्राधान्य देत आहेत. विना वापर असलेल्या पोलीस वसाहतीभोवती पावसाळी गवत, झाडे झुडपे वाढली आहेत. पोलिसांचा वावर असला की सुरक्षित वाटणारी पोलिस वसाहत भयावाह वाटत आहे.




**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहिर सुचना**
**दिव्यांग कल्याण विभाग**

मा. अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने दिव्यांग कल्याण विभागातील सन २०२५-२०२६ करीता दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार व पुनर्वसन सेवा राबविण्याकरिता साहित्य पुरविणेबाबत बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे.

आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./ ३१२५/प्र.क्र.५३४/५५१/२०२५
दि. १७/१०/२०२५

सही/-
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका


## पेण तर्फे तळे येथे रॅली, पथनाट्यातून राष्ट्रीय पोषण माह सप्ताह

**माणगाव : प्रतिनिधी**

एकात्मिक बालविकास सेवा योजना माणगाव अंतर्गत बीट-इंदापूर-२ यांचेमार्फत पेण तर्फे तळे येथे आठवा राष्ट्रीय पोषण माह सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.



पोषण माह सप्ताह अंतर्गत पेण तर्फे तळे गावात महिला, किशोरवयीन मुली, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शालेय विद्यार्थी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेत फळे, फुले, पालेभाज्या यांची सजावट केलेली पोषण पालखी घेऊन रॅली काढली. ढोल-ताशाच्या गजरात निघालेल्या या रॅलीने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

या वेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस, बालकांच्या माता पालक यांनी प्रधानमंत्री मातृत्व वंदन व लेक लाडकी योजनेवर आधारीत अतिशय प्रभावी पथनाट्य सादर करुन जनजागृती केली. अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांनी पोषण माह अंतर्गत पक्षांच्या गोष्टीवर पथनाट्य सादर करुन ग्रामस्थांची मने जिंकली. पुढच्या सत्रात पोषण माह कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी आहार प्रात्यक्षिकांची मांडणी करुन सर्व किशोरवयीन मुली, गरोदर माता, स्तनदा माता यांना आहाराचे महत्व स्पष्ट केले.अंगणवाडी सेविकांनी तिरंगा आहाराचे प्रात्यक्षिक मांडून महत्त्व सांगितले.

सदर कार्यक्रमासाठी माणगाव तालुका बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती अस्मिता बिर्जे यांनी उपस्थित महिला, शालेय विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि ग्रामस्थ व महिला मंडळ यांना आठव्या राष्ट्रीय पोषण महा अभियान, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, लेक लाडकी योजना, पोषण वाटिका इत्यादी बाबत सखोल मार्गदर्शन करून गावातील गरोदर माता यांचे गोदभरण कार्यक्रम अगदी थाटामाटात व उत्साहात साजरा केला.

अंगणवाडी सेविका यांनी अन्नप्राशन दिवसही साजरा केला तसेच खरवली अंगणवाडी सेविका यांनी उत्तम पूर्व प्राथमिक पाठ घेतला. ग्रामस्थ मंडळ पेण तर्फे तळे यांनी उत्तम भोजनाची व्यवस्था केली.

सदर कार्यक्रमाला एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी अस्मिता बिर्जे, विस्तार अधिकारी मधुकर फड, इंदापूर- दोन बीट पर्यवेक्षिका रत्नप्रभा म्हात्रे, माजी केंद्रप्रमुख सुरेश वडेकर सर्व इंदापूर-दोन अंगणवाडी सेविका, मदतनीस गरोदर स्तनदामाता, किशोर मुली, शालेय विद्यार्थी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी पर्यवेक्षिका रत्नप्रभा म्हात्रे, अंगणवाडी सेविका भारती मोंडे, कविता वडेकर,ग्रामस्थ मंडळांनी मेहनत घेतली. कार्यक्रमास प्रतिसाद लाभला.


**कामगार पाहिजेत**

पनवेलमधील
मालवणी हॉटेल
साठी 12th pass
सुपरवायझर/कॅशिअर व
वेटर पाहिजे आहे,
पगारा व्यतिरिक्त राहण्याची
व जेवणाची सोय आहे.

संपर्क:८१०४४५३१६४/ ९८६०७७८१५३/ ८२९१७३४९३३



**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

**जाहीर सूचना**

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

याद्वारे सूचित करण्यात येते की, राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सन २०२५-२०२६, २०२६-२०२७ तसेच २०२७-२०२८ या तीन आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी त्या त्या विभागातील सनदी लेखापालांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

अंतिम दिनांक : ३१/१०/२०२५

अधिक तपशीलासाठी (नमुना अर्ज, संमतीपत्र, प्रपत्र 'अ' इ.) ग्राम विकास विभागाची www.rdd.maharashtra.gov.in ही वेबसाईट पहावी.

आदेशानुसार


## चिमुकल्या हातांनी साकारले गडकिल्ले!

**धाटाव : प्रतिनिधी**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर रोह्यातील महादेववाडी, शिव समर्थ नगर येथे चिमुकल्या मुलांनी उत्साहाने गडकिल्ले बनविण्याचा उपक्रम हाती घेतला. या अनोख्या उपक्रमासाठी राजमुद्रा फाउंडेशनने पुढाकार घेत समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले.



राजमुद्रा फाउंडेशनचे पदाधिकारी आणि युवा व्यावसायिक श्रीमंत दरडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, फाउंडेशनचे संस्थापक अमित घाग यांच्या माध्यमातून मुलांना गड बांधणीसाठी लागणारी रंगरंगोटी, साहित्य तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांच्या प्रतिकृतींसाठी अर्थसहाय्य करण्यात आले.

गड निर्माण करण्याच्या या प्रक्रियेमध्ये मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांच्या डोळ्यांत चमकणारा शिवप्रेमाचा तेजस्वी भाव पाहून सर्व उपस्थित भारावून गेले. राजमुद्रा फाउंडेशनने घेतलेल्या या पुढाकारामुळे मुलांमध्ये इतिहासाची जाणीव, परंपरेची जोड आणि छत्रपतींच्या कार्याबद्दल आदरभाव निर्माण झाला.कार्यक्रमादरम्यान चिमुकल्या मुलांनी प्रेमाने श्रीमंत दरडे यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा वाढदिवस साजरा केला. त्यावेळी परिसर जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी दुमदुमून गेला.

या प्रसंगी राजमुद्रा फाउंडेशनचे संस्थापक अमित घाग, श्रीमंत दरडे, नरेश कोकरे, संकेत मोरे, धीरज मोंडे, सन्नी भगत यांच्यासह अनेक मान्यवर व स्थानिक नागरिक उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि शिवप्रेम यांचा संगम साधणाऱ्या या उपक्रमाबद्दल राजमुद्रा फाउंडेशनचे सर्वत्र कौतुक होत आहे.


वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर



**सार्वजनिक सूचना**

आम्ही, मे. एक्सेल रिॲलिटी, १, सत्य किराण, प्लॉट क्रमांक-२, सेक्टर-१२, न्यू पनवेल (पूर्व), नवी मुंबई ४१०२०६, त्याच्या भागीदार श्री. सुनील एम. माखिजा, नोंदणीकृत भागीदार असे घोषित करतो की,:-

एक्सेल रिॲलिटीचे मालक, ताब्यात घेतले आणि जप्त केलेले किंवा अन्यथा सर्वे क्रमांक १४१/३/८, १४१/३/९ १४१/२/४/बी, म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमतेस पुरेसे पात्र आहे.

सक्षम प्राधिकरण म्हणजेच असोसिएट प्लॅनर (नैना) सिडको, खाली दिलेल्या तपशीलांनुसार विविध इमारती बांधण्यासाठी/तयार करण्यासाठी आम्हाला परवानगी आणि प्रारंभ प्रमाणपत्र जारी केले आहेः -

| | |
|---|---|
| मालक आणि विकासक यांचे नाव आणि पत्ता | मे एक्सेल रिऍलिटी<br>१, सत्य किरण, प्लॉट नं-२, सेक्टर -१२, नवीन पनवेल (पूर्व), नवी मुंबई ४१०२०६, |
| मालमत्तेचे वर्णन | सर्वे क्रमांक १४१/३/८, १४१/३/९, १४१/२/४/बी, गाव आदई तालुका पनवेल, जिल्हा रायगड |
| आर्किटेक्ट चे नाव आणि पता | कार्यालय क्रमांक २०&२१, रहेजा आर्केड, सेक्टर-११, प्लॉट क्रमांक ६१, सीबीडी बेलापूर - नवी मुंबई ४००६१४. |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता | रिद्धी सिद्धी एन्टरप्राइसेस<br>पता. फ्लॅट क्रमांक ३०३, नवीन राजहंस<br>सी.एच.एस. आदई गाव, न्यू पनवेल (ई), रायगड -४१०२०६. |
| ऑर्डर क्रमांक आणि प्रारंभ प्रमाणपत्राची तारीख | सिडको/नैना/पॅनवेल/अडाई/बीपी -००७०४/सीसी/२०२५/०८५०, दिनांक: ४ मार्च २०२५. |
| एफ.एस.आय. परवानगी | १.६ |
| एकूण रहिवासी घर संख्या | ६७ |
| पत्ता जेथे तपशीलवार मंजूर योजनांच्या प्रती तपासणीसाठी उपलब्ध आहेतः | शॉप १, सत्य किरण, प्लॉट क्रमांक २, सेक्टर-१२, न्यू पनवेल (पूर्व), नवी मुंबई ४१०२०६. |

**एक्सेल रिऍलिटी** सत्य किरण, प्लॉट नं-२, सेक्टर १२, नवीन पनवेल (पूर्व), ४९०२०६.

sd/-
For EXCEL REALITY
Partner



।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।
**खोपोली नगरपरिषद, खोपोली**
ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र.केएमसी/आरोग्य/३२०२ दिनांक :- १६/१०/२०२५

**खोपोली नगरपरिषद**
**जाहीर आवाहन**

खोपोली शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक फटाके वापर करणारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसूचना क्रमांक G.S.R.६८२ (E), D ५.१०,१९९९ अन्वये १२५ dB (AI) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास सक्त मनाई केली आहे.

अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बरियम सॉल्ट, लिथीयम, आर्सनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकामुळे विषारी वायु तयार होतात हे वायू, प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच जनहित याचिका क्र.१५२/२०१५ मध्ये मा.ना.उच्व न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करणेची नाही. तसेच परवानगी असलेले फटाके नगरपरिषदेचे निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करणेची आहे.

महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियान ६.० आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अभियानांतर्गत फटाकेमुक्त, प्लास्टीकमुक्त, कचरामुक्त, प्रक्षनमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल, सण-उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करू, सदर अभियानांतर्गत नागरीकांनी फटाक्यांचा वापर टाळा, प्लॉस्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करा. सण समारंभामध्ये टाकावू वस्तूंचा व पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचा वापर जास्तीतजास्त करावा, पर्यावरणपूरक प्रदुषणमुक्त दिवाळी साजरी करावी.

तरी येणारी दिवाळी हरीत व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करू या. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो. अशा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

सही /-
उपमुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद

# पनवेलमध्ये व्यापक स्वच्छता

## दुर्लक्षित ठिकाणी स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नागरिकांना दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ, निरोगी व प्रदूषणमुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी मोहीम अंतर्गत स्वच्छता उपक्रम राबविले जात आहेत.



त्याचाच एक भाग म्हणून १५ ऑक्टोबर २०२५ रोजी उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्मशानभूमी व कचरा साठणारी ठिकाणे व दुर्लक्षित ठिकाणांवर सखोल स्वच्छता मोहीम (डीप क्लीनिंग मोहीम) राबविण्यात आली.

या मोहिमेंतर्गत सर्व प्रभागातील स्मशानभूमी परिसर तसेच दुर्लक्षित, कचरा साठणारी ठिकाणे येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमाचे उद्दिष्ट केवळ स्वच्छता करणे एवढेच नसून, अशा संवेदनशील ठिकाणांचे पर्यावरणीय आणि आरोग्यदृष्ट्या सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण राखणे हेदेखील होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या मोहिमेमध्ये एकूण २४ स्मशानभूमींची सखोल स्वच्छता करण्यात आली. याशिवाय, शहरातील विविध भागांमध्ये असलेल्या ३८ दुर्लक्षित कचरा साठणाऱ्या ठिकाणीदेखील विशेष डीप क्लीनिंग मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये एकूण ३३ हजार ७०० रनिंग मीटर रस्त्यांची सफाई करण्यात आली.

या डीप क्लीनिंग मोहिमेमध्ये एकूण ५३६ सफाई कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्व कर्मचाऱ्यांनी सकाळपासून मोठ्या जबाबदारीने आणि समर्पणाने काम केले. या वेळी मनपा प्रशासनाने सफाईसाठी आवश्यक सर्व साधनसामग्री, यंत्रसामग्री, जेसीबी, ट्रॅक्टर, डंपर इत्यादींची प्रभावी व्यवस्था केली होती. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नेतृत्वात ही मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली.

या मोहिमेविषयी उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले की, दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर ज्याप्रमाणे आपण आपल्या घराची स्वच्छता करतो त्याप्रमाणे हे शहरदेखील आपले घर असून दिवाळी सणाची तयारी म्हणून शहराच्या सर्व भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक प्रभागातील नियमित स्वच्छता उपक्रमांना गती देण्यात येत आहे. डीप क्लीनिंग मोहिमेमुळे केवळ परिसर स्वच्छ होत नाही, तर नागरिकांमध्येही स्वच्छतेबद्दलची जाणीव वाढते.

# नवी मुंबईतील नाट्यकर्मी, संस्थांना दिवाळी भेट

## मंत्री गणेश नाईकांकडून दिलासा; तालमीसाठी मिळणार स्वस्तात नाट्यगृह

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील रंगकर्मी तसेच, नाट्य संस्था या हौशी तसेच, प्रायोगिक तत्वावर कार्यरत असल्यामुळे बालनाट्य, एकांकिका तसेच, हौशी नाटक करतांना तालमीकरिता तालीम सभागृह कमीत कमी खर्चात उपलब्ध होणार आहे.

रंगकर्मी व नाट्यसंस्थाकरीता दिलासा देणारी बाब ठरणार आहे. भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ, नवी मुंबई प्रभारी सुनील पगार यांनी जनता दरबारात वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे याबाबत मागणी केली होती. त्यास यश आले आहे.

नाट्य कला सादर करतांना येणारा इतर खर्च त्यामध्ये नेपथ्य, प्रकाश योजना, संगीत, वेशभूषा, रंगभूषा इ. करतांना सर्वात मोठा खर्च हा तालमीकरिता होतो. त्याच अनुषंगाने रंगकर्मींना दिलासा मिळावा या उद्देशाने भाजपा सांस्कृतिक प्रकोष्ठ नवी मुंबई प्रभारी सुनील रमेश पगार यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात याविषयी मागणी केली होती.

याबाबत वनमंत्री गणेश नाईक यांनी तत्काळ नवी मुंबईतील नाट्य संस्थांना विष्णुदास भावे नाट्यगृहाचा तालीम हॉल केवळ ५०० रुपयांत देण्याचे आदेश नवी मुंबई महानगरपालिकेला दिले. त्यामुळे नवी मुंबईतील रंगकर्मींना दिलासा दिला आहे, असे माजी स्थायी समिती सभापती अनंत सुतार यांनी सांगितले.

**नवी मुंबईत आम्ही १९८१पासून नाट्य चळवळ सुरू ठेवलेली आहे. विष्णूदास भावे नाट्यगृहाचा तालीम हॉल भाड्याने घ्यायचा, तर तीन तासकरिता एक हजार आणि GST असा खर्च येत होता. नवी मुंबईतील संस्था प्रायोगिक तत्वावर, हौशी रंगभूमीवर कार्यरत आहेत आणि त्यांना कोणातही आर्थिक पाठबळ नाही. कॅबिनेट मंत्री गणेश नाईक यांनी कलाकारांकरिता अत्यल्प दरात तालीम सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल मन:पूर्वक आभार!**
**–रवी वाडकर,** जेष्ठ रंगकर्मी, नाट्य लेखक, दिग्दर्शक, कवी, सूत्रसंचालक

**येणाऱ्या काळात नवी मुंबईतील कलाकारांच्या समस्या संपुष्टात आणून कलाकारांना दिलासा देण्यातकरिता आम्ही प्रयत्न करणार आहोत. नवी मुंबईतील कलाकारांना मिळालेल्या दिवाळी भेटीमुळे कलाकारांमध्ये आनंदाची भावना असून, आम्ही नवी मुंबईतील सर्व कलाकार गणेश नाईक यांचे आभार मानतो.**
**–सुनील पगार,** भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ, नवी मुंबई प्रभारी

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये १६ व १७ ऑक्टोबर रोजी रोबोटिक, गणित आणि विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेऊन स्वतःच्या हाताने रोबोटिक, गणित तसेच विज्ञान विषयासंबंधी प्रकल्प बनवले होते. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ७६ च्या वर गणिताचे व १३९ वर विज्ञानाचे प्रकल्प आणी ६९ च्या वर रोबोटिकचे प्रकल्प सादर केले. त्यांना रोबोटिक, गणित तसेच विज्ञान विषयाच्या शिक्षक वृंदाचे मार्गदर्शन लाभले. या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण' इस्रो स्पेस स्टेशन हे होते. ही प्रतिकृती चित्रकलेचे सहाय्यक शिक्षक वृंदानी बनविली होती.

स्पेस स्टेशन बनविण्यास शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद यांचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, राहुल घरत आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी मॅडम यांनी विशेष गुणगौरव करून अभिनंदन केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे करिअर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१६) मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत वर्षानिमित्त रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर व ताण व्यवस्थापन या विषयावर दुसऱ्या सत्राचे आयोजन केले होते.

या सत्राच्या प्रमुख वक्त्या म्हणून अंजनी सराफ (G20 शिखर परिषदेच्या माजी वक्त्या, व तीन संस्थांच्या संस्थापक) उपस्थित होत्या तसेच या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना दहावी व बारावी नंतरच्या टप्प्यावर येणाऱ्या आव्हानांची माहिती दिली तसेच तणावावर मात करण्यासाठी पाच टप्प्यांची प्रक्रिया समजावून सांगितली. या सत्रात एकूण १०९ विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. या सत्रात करिअर मार्गदर्शन आणि तणाव व्यवस्थापन या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या वेळी वाणिज्य शाखेसाठी प्रा. स्नेहा नाईक व विज्ञान शाखेसाठी डॉ. पूजा लांजेकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी परवानगी व मार्गदर्शन दिल्याबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व निशा नायर (मुख्याध्यापिका, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर) यांचे मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. रित ठुले यांनी विशेष आभार मानले तसेच यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे मन:पूर्वक आभार मानले.

या उपक्रमासाठी मॅनेजमेंट विभागातील प्रा. अर्पिता नायक प्रा. आकांक्षा त्रिपाठी, प्रा. शितल चव्हाण, प्रा. रेहनुमा खान प्रा. शिवानी मानकामे व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही उपस्थित राहून सहकार्य केले.



**कामोठे : से. १४ येथील डॉ. अभिषेक बोरसे यांच्या क्लिनिकचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी आरोग्य सभापती डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते झाले.**

# एमएनएम विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम जयंतीनिमित्त जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे एपीजे अब्दुल कलाम यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.



विद्यार्थ्यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या इंग्रजी व मराठीमधील साहित्याचे प्रकट वाचन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर कलामांचे विचार, राष्ट्रपती म्हणून त्यांची कारकीर्द, विद्यार्थी तसेच देशाबद्दल दिलेले योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी डॉ. अब्दुल कलाम यांना विनम्र अभिवादन केले.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दिवाळीनिमित्त सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएसई उलवेचा स्टाफ मुक्ता खटावरकर, हर्षल फडके, संग्राम फोफेरकर, यतीन कोळी, हर्ष कोळी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# काँग्रेस कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी मंगळवारी शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. उरण विधानसभेचे रायगड जिल्हाप्रमुख अतुल भगत तसेच उरण तालुकाप्रमुख दीपक ठाकूर, विधानसभा संपर्कप्रमुख रमेश म्हात्रे, रायगड जिल्हा संघटक महेंद्र पाटील, तालुका संपर्कप्रमुख चंद्रकांत पाटील, उरण शहर प्रमुख सुलेमान शेख, चाणजे विभाग प्रमुख अक्षय म्हात्रे त्यांच्या समवेत अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



शिवसेना मध्यवर्ती कार्यालय उरण येथे झालेल्या शिवसेना पक्षप्रवेशांमध्ये रफिक रशीद शेख चारफाटा उरण, भारत शेंडगे चार फाटा, योगेश पाटील, विकी झुवाटकर, उस्मान खान, अशोक मोटे, आतिश झावरे, पंकेश पाटील, सुशांत पाटील, योगेश भोसले समीर केळकर आदींनी पक्षप्रवेश केला.

जिल्हाप्रमुख अतुल भगत यांनी सर्व कार्यकर्त्यांचा शिवसेना पक्षांमध्ये स्वागत करून शिवसैनिक म्हणून पुढील राजकीय प्रवासात व सामाजिक कार्यात पक्ष संघटना आणि उरण विधानसभेचे सर्व पदाधिकारी हे तुमच्या खांद्याला खांदा लावून काम करतील अशी ग्वाही देऊन सर्वांचे आभार मानले. या प्रवेशासाठी खास मेहनत घेतलेले सुलेमान शेख शहर प्रमुख तसेच दशरथ चव्हाण वाहतूक सेना उरण यांचेदेखील विशेष अभिनंदन केले.

# सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये रांगोळी स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

उच्च माध्यमिक विद्यालयातील ४२ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. तेजस्वी रंगाचा नवनवीन डिझाईन्सचा वापर करून विद्यार्थ्यांनी सण, एकता, परंपरा या विषयाचे दर्शन घडवत आकर्षक व सुंदर रांगोळ्या साकारल्या. आयटी विषयाच्या सहशिक्षिका ज्योती वाघ व माध्यमिक विभागाचे कलाशिक्षक महेश पोपटा यांनी परीक्षणाचे काम केले.

या स्पर्धेत वृंदा डांगडे (अकरावी सायन्स) या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक तर तेजस्विनी नाळगे (अकरावी सायन्स), श्रावणी सावंत (अकरावी सायन्स) यांनी द्वितीय क्रमांक तर समृद्धी गावडे (बारावी सायन्स) या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकावला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉमर्स विभागाच्या सहशिक्षिका योगिता जोरी यांनी केले. या स्पर्धेने विद्यालयाच्या परिसरात उत्सव आणि आनंदाचे रंग भरले.

विद्यार्थ्यांनी रांगोळीत साकारलेल्या कलेने दिवाळीचा खरा संदेश, आनंद, ऐक्य व सर्जनशीलता सर्व संकुलात पसरली. या कार्यक्रमासाठी ज्युनिअर विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.




**निवडक**



## लोखंडे विद्यालयात वाचन प्रेरणा दिन

मुरूड : पीटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यामंदिरात वाचन प्रेरणा दिन उत्साह पूर्ण साजरा करण्यात आला. यावेळी या शाळेचे मुख्याध्यापक अरुण खुळपे सर यांच्या हस्ते डॉक्टर ए. पी. जे. कलाम यांच्या तसबिरीस पुष्पमाला अर्पण करण्यात आली. यावेळी या शाळेचे सह शिक्षक सुखदेव सवईसर्जे यांनी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी, या शाळेचे मुख्य लिपीक दीपक भोसले, संजय ठमके, भागीनाथ बांगर, सुप्रिया रेडीज, एकनाथ कोळी, संदीप इंगवले, सुनील तेलंगे, नीलम गोळे, रेखा रेडीज आदी उपस्थित होते.

## जिंदल विद्यालयात वेशभूषा सोहळा



मुरूड : जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे सोमवारचा दिवस उत्साह, प्रेम आणि स्नेहाने उजळून निघाला. शाळेच्या प्री–प्रायमरी विभागात नर्सरी ते यू.के.जी.विभागातील विद्यार्थ्यांनी आई व मी या आगळ्यावेगळ्या आणि भावनिक संकल्पनेवर आधारित वेशभूषा सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून नीलू मलिक उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी शाळेच्या या सर्जनशील संकल्पनेचे कौतुक केले. आई–मुलांच्या जोड्यांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.



**धाटाव : कोरस कंपनी प्रशासनाने दिलेला शब्द पाळत कंत्राटी कामगारांच्या खात्यात बोनस, एलटी बोनस आणि पगार जमा करण्यात आला आहे. कंपनी आणि कामगार यांच्यातील संवादाच्या माध्यमातून समस्येचे समाधान झाल्याने दोन्ही बाजूंमध्ये समाधानाचे वातावरण आहे.**

# महापारेषण टॉवर लाईनबदल्यात योग्य मोबदला मिळावा

## नागोठणे विभागातील वरवठणे येथील शेतकऱ्यांचे मंत्री गोगावले, खासदार धैर्यशील पाटील यांना साकडे

**नागोठणे : बातमीदार**

सन १९८५–८६मध्ये नागोठणे विभागातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमीनीमधून महापारेषण एमएसईबीची टॉवर लाईन टाकताना शेतकऱ्यांचा अशिक्षितेचा गैरफायदा घेत महापारेषण एमएसईबीकडून टॉवर लाईन टाकण्यात आली असून आमचा सदर लाईनला विरोध नाही, परंतु शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी मंत्री भरत गोगावले व खासदार धैर्यशील पाटील यांना नागोठणेजवळील वरवठणे येथील शेतकरी किशोर म्हात्रे, गणपत म्हात्रे, पांडुरंग म्हात्रे, संतोष म्हात्रे, हर्षल ढमाल, राकेश म्हात्रे, सुरेश करजेकर, रुपेश शेडगे, दत्तात्रय करजेकर, संकेत दाभाडे, यादव करजेकर, कैलास करजेकर, प्रकाश करजेकर, नथुराम शेडगे, विश्वनाथ शेडगे, संतोष करजेकर यांनी निवेदना मार्फत साकडे घातलेले आहेत.



आपल्या निवेदनात वरवठणे शेतकरी म्हणतात की, आमचा या टॉवर लाईनला विरोध नाही. परंतु महापारेषण एमएसईबीकडून आमच्या जमिनीची चिरफाड करून कोणताही मोबदला न देता टॉवर लाईन टाकण्यात आली आहे. आज जी लाईन चालू आहे ती कमी दाबाची आहे. याच कमी दाबाच्या लाईन खालून शेतीवर शेती करण्यासाठी औजारे घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांना आत्ता चालू असलेल्या लाईनमुळे शॉक लागतो. शेतातील गवत,भात व कुंपणाला आग लागते आणि आता जास्त दाबाची नवीन टॉवर लाईन टाकण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असून याला जबाबदार कोण?.

विशेष म्हणजे नवीन लाईनच्या ३५ मीटरमध्ये कोणतेही बांधकाम किंवा इतर कोणतेही काम करण्यास महापारेशन एमएसईबीची मनाई आहे. मग आमच्या उर्वरित शेतीचे आम्ही काय करायचे?. आम्हाला आमची जमीन विकायची असेल तर कोण विकत घेणार?. असे अनेक प्रश्न आम्हा शेतकऱ्यांना पडलेला असून आम्हाला योग्य तो न्याय द्यावा, अशी विनंती शेवटी वरवठणे शेतकऱ्यांनी निवेदना मार्फत केली आहे.

# साळावच्या जिंदल विद्यामंदिरात बालसंरक्षणविषयक कार्यशाळा



**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियम पोस्कोविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा शैक्षणिक समन्वयक अनीता बलायन आणि सामाजिक विज्ञान विभाग प्रमुख जयलक्ष्मी मेनन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यशाळेचा उद्देश शिक्षकांना पोस्को कायद्याची माहिती, तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया, व शाळेतील बालसुरक्षेसाठी शिक्षकांची भूमिका या बाबतीत जागरूक करणे हा होता.

या कार्यशाळेद्वारे कर्मचाऱ्यांना पॉक्सो अधिनियमातील महत्त्वाच्या तरतुदींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, शाळेमध्ये सतर्कता व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी या उपक्रमास पूर्ण पाठिंबा दर्शवत सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची हमी देणे ही शाळेची प्राथमिक जबाबदारी असून, अशा कार्यशाळा ही जबाबदारी अधिक सक्षमपणे पार पाडण्यास मदत करतात.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी संयोजकांचे व शाळेचे अभिनंदन करत सांगितले की, विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि जबाबदार शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हीच शाळेची खरी बांधिलकी आहे, आणि ही कार्यशाळा त्याचे उत्तम उदाहरण आहे.

# माथेरानकरांना दिवाळी फराळाचे साहित्य

**माथेरान : प्रतिनिधी**

मुंबई येथील पीस सामाजिक संस्थेच्या वतीने माथेरानकरांना दिवाळी फराळाचे साहित्य कम्युनिटीसेंटर हॉल येथे वाटप करण्यात आले असून गावकऱ्यांची दिवाळी गोड करण्यात आली आहे.

पीस सामाजिक संस्थेच्या माध्यमातून माथेरान मध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. यामध्ये आदिवासी बांधवांना कपडे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, किराणा सामानाचे वाटप असे विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित केले जात असतात. या वेळी पीस संस्थेमार्फत माथेरानमधील नागरिकांना दिवाळीचे साहित्य वाटप करण्यात आले. फराळाच्या



साहित्य सोबत शालेय विद्यार्थ्यांना वही, पेनदेखील या वेळी वाटप करण्यात आले. माथेरानमधील अनेक कुटुंबाचा उदरनिर्वाह आजही हातावरच असल्याने अनेकांना दररोज कष्टाची कामे करावी लागतात. अनेक महिला आजसुद्धा मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा सांभाळ करतात. अश्या कुटुंबांना पीस संस्थेच्या वतीने दिवाळी फराळाच्या सामानाची वाटप करून मदतीचा हात मिळाला आहे. यामुळे या कार्यक्रमास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती तसेच या वेळी माथेरान मैत्री ग्रुपकडून पीस सामाजिक संस्थेला सहकार्य मिळाले.

या कार्यक्रमावेळी माथेरान मैत्री ग्रुपच्या महिला कार्यकर्त्या वर्षा शिंदे, रेखा चौधरी, मनीषा शिंदे, वनिता दिघे, सुहासिनी शिंदे, सोनम दाभेकर, तन्वी दाभेकर आदी उपस्थित होते.

# रास्तभाव धान्य दुकान लाभार्थ्यांना आवाहन

**रायगड :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय व प्राधान्य गट योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत रास्तभाव धान्य दुकानातून धान्य वाटप करण्यात येते. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पात्र लाभार्थ्यांनी २० ऑक्टोबर २०२५पर्यंत रास्त भाव धान्य दुकानातुन धान्याची उचल करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे यांनी केले आहे.

या कालावधीत ई–केवायसी न केलेल्या प्रत्येक लाभार्थ्यांचे दुकानदाराने मशीनवर अंगठा घेऊन ई–केवायसीचे काम पूर्ण करुन घ्यावे, याबाबत कोणतीही कुचराई करुन नये. ही लाभार्थ्यांना शेवटची संधी असून ई–केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांचे धान्य बंद करण्यात येईल.

ज्या पात्र लाभार्थ्यांनी ई–केवायसी केली नसेल त्यांनी दुकानदाराकडे धान्य घेताना ई–केवायसी करुन घ्यावी. तसेच पात्र लाभार्थ्यांनी महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाट न पाहता दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत दुकानातून धान्याची उचल करावी. पुरवठा यंत्रणेने सर्व रास्तभाव दुकाने चालू राहतील याची दक्षता घ्यावी व सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांनी या कालावधीत दुकाने चालू ठेवून लाभार्थ्यांना १०० टक्के धान्याचे वाटप करावे.

# दिवाळीनिमित्त किल्ले बांधण्यात रमले बालगोपाळ

**माणगाव : प्रतिनिधी**

दिवाळी व किल्ल्यांची मोठी परंपरा महाराष्ट्रामध्ये आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर लहांनगे,प्रौढ माणसे किल्ल्यांच्या प्रतिकृती आपल्या घरासमोर, सोसायटीच्या आवारात व सार्वजनिक ठिकाणी तयार करतात.

रायगड जिल्ह्यात किल्ल्यांचे असलेली पार्श्वभूमी यामुळे दिवाळीतील किल्ले बांधणीला आगळेवेगळे महत्व आहे. दिवाळीनिमित्त बाजारपेठेतही तयार किल्ल्यांच्या प्रतिकृती विकण्यासाठी उपलब्ध झाल्या असून विविध आकार, प्रकार यामध्ये या प्रतिकृती दिसून येत आहेत.

प्रथम सत्र परीक्षा संपत असून दिवाळी निमित्त बच्चे कंपनी किल्ले बांधण्यात रंगली असल्याचे दिसून येत आहेत. ज्येष्ठांचीही त्यांना मदत होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज



प्रतिकृती, सिंहासन, रांगोळी, गवत, मावळे, सैनिक, प्राणी यांना बाजारपेठेत चांगली मागणी असून किल्ल्यांच्या प्रतिकृती साठी यांचीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते आहे.

या वर्षी मोठ्या प्रमाणात दिवाळीचा उत्साह दिसून येत असून बच्चे कंपनी किल्ले बांधण्यात व्यस्त असल्याने पालकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

दिवाळीनिमित्त दरवर्षी शाळेच्या व पालकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही किल्ले बांधतो. या वर्षी आम्ही मित्रांच्या मदतीने सुंदर अशी प्रतिकृती तयार करत आहोत.मातीचा किल्ला बांधण्यात काही वेगळाच आनंद असतो तो आम्हाला मिळत आहे, असे विद्यार्थी नीरज सुतार याने सांगितले.

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर किल्ले बांधणी करून ऐतिहासिक परंपरा जतन केली जाते. यातून किल्ल्यांची माहिती व निर्मितीचा आनंद मिळतो. यावर्षी पुन्हा लहानगे किल्ले बनविण्यात व्यस्त असल्याने समाधान वाटत आहे.**
**–श्रीकृष्ण गरधे, शिक्षक**

# दिव्यांग बांधवांना अर्थसहाय्य; भेटवस्तूंचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

युवा नेतृत्व व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत वाशी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांसाठी अर्थसहाय्य व भेटवस्तू वाटपाचा उपक्रम पार पडला. वाशी ग्रामपंचायत हद्दीतील महादेववाडी, लांढर, कारिवणे आणि वाशी येथील एकूण २४ दिव्यांग बांधवांना ग्रामपंचायतीतर्फे पाच टक्के अर्थसहाय्य तसेच भेटवस्तू मंगळवारी (दि.१४) वाशी ग्रामपंचायतीमध्ये उपक्रम झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर होते. या वेळी उपसरपंच अरविंद मगर यांनी दिव्यांग बांधवांना भेटवस्तूंचे वाटप केले. कार्यक्रमात सरपंच वंदना वारगुडे, जिल्हा राष्ट्रवादी उपाध्यक्ष शंकर भगत, तालुका उपाध्यक्ष अनिल भगत, तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला सदस्य अंतोष शिर्के, पांडुरंग हंबीर, दिपाली धामणसे, समिता भगत, समिधा सुतार व ग्रामस्थ नथुराम मगर, काशिनाथ जंगम, लक्ष्मण रटाटे, काशिनाथ लहाने, रमेश जोगडे, रमेश बर्डे, तानाजी रटाटे, किशोर भगत, राजु सुतार, भरत धवडेकर, सहदेव पार्टे, ज्ञानदेव पेटकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ, महिला व दिव्यांग बांधव उपस्थित होते.




# तळा बाजारपेठदिवाळीच्या साहित्याने सजली!

**तळा : प्रतिनिधी**

दिवाळी उत्सव सुरू होत असल्याने नागरिकांची खरेदीसाठी तळा बाजारपेठेत आता वर्दळीला सुरूवात झाली आहे. बाजारपेठ सजली असून विविध प्रकारच्या साहित्याची आवक मोठ्या प्रमाणात झाली आहे, मात्र पाहिजे तशी खरेदी होताना दिसत नाही, त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये कही खुशी कही गम अशी अवस्था झाली होती

आता मात्र ग्राहकांमधे बाजारात थोड्या प्रमाणात खरेदीसाठी वाढ होताना दिसत आहे. तळा तालुका हा शेतकरी वर्ग असणारा असल्याने सध्या परतीचा पाऊस त्यातच परतीच्या पावसाचा शेतकरीवर्गात झालेला त्रास यामुळे नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. भातशेती कापणीला सुरुवात झाल्याने शेतकरीवर्ग शेतीच्या कामात



रमला आहे.

बाजारात विविध आकाराच्या, विविध रंगांचे आकाश कंदिल, दिवे, तसेच चीनी मातीचे दिवे, बाजारात उपलब्ध झाले असून मातीच्या दिव्यांना ग्राहकांची अधिक पसंती आहे. परतीच्या पावसामुळे उशीरा बच्चे कंपनी किल्ले बनवण्यासाठी सैनिक व लागणारे साहित्य खरेदी करणार असे चित्र दिसत आहे.

बाजारात दिवाळीचा फराळ उपलब्ध झाला आहे. घरगुती फराळ करणे व घरगुती फराळ विक्रेत्यांकडून फराळ खरेदी होताना दिसत आहे. त्यातच हवामान बदल शेतकरीला याचा होणारा त्रास यामुळे आर्थिक परिस्थिती या सर्वांमुळे पाहिजे तशी बाजारात खरेदी होताना दिसत नाही. यावर्षी मागील वर्षापेक्षा वस्तूंचे दर वाढल्याचे पहावयास मिळत आहे.

## संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेचे थकित अनुदान अखेर लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाले असून शेकडो गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

भाजप माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे यांच्या नेतृत्वाखाली भाजप कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने २१ ऑगस्ट २०२५ रोजी माणगाव तहसीलदार दशरथ काळे यांना दिलेल्या निवेदनानंतर शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत तातडीने कार्यवाही केली. त्यामुळे माणगाव तालुक्यातील लाभार्थ्यांत समाधान व्यक्त होत आहे.

संजयअप्पा ढवळे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे संबंधित विभागांनी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थकित रक्कम जमा केली आहे. यामुळे तालुक्यातील अनेक गरजूंना सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळाला आहे. या योजनेचा मूळ उद्देश आर्थिकदृष्ट्या अशक्त घटकांना मदत करणे हा असल्याचे ढवळे यांनी सांगितले होते. शासनाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे हा उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य झाला आहे.

माणगाव तालुक्यातील लाभार्थ्यांनी संजय आप्पा ढवळे तसेच शासन व स्थानिक प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत. या घटनेतून शासन, प्रशासन आणि जनप्रतिनिधी यांच्या समन्वयातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी कशी होऊ शकते याचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण झाले आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाउंडेशनचे सौ वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव– रोहा येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे बुधवारी दरवर्षीप्रमाणे दिवाळीनिम्मित रा.जि.प शाळा आदिवासीवाडी बरसोली, धाटाव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

१५ ऑक्टोबर म्हणजे डॉ ए. पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंती (वाचन प्रेरणा दिन) निम्मित महाविद्यालयात डॉ कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रा.जि.प शाळा आदिवासीवाडी बरसोली येथे



विद्यार्थ्यासह भेट दिली आणि महाविदयालयाच्या ग्रंथापाल सौ निर्मला थोरात यांच्याकडून शाळेला पुस्तके भेट देण्यात आले. तसेच एनएसएसच्या कार्यक्रम अधिकारी प्रा ममता बिंद आणि विद्यार्थिनीकडून शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या वेळी रा.जि.प शाळा, बारसोली येथील शिक्षिका सौ रेणुका वैद्य, विद्यार्थी आणि पालक प्रतिनिधी तसेच मोरे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा ममता बिंद, ग्रंथपाल सौ निर्मला थोरात, कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि एनएसएसच्या २१ स्वयंसेविका उपस्थित होत्या.

# वनडे मालिकेआधी ऑस्ट्रेलिया बॅकफूटवर

## एक-दोन नव्हे; तर पाच दिग्गज खेळाडू बाहेर




**सिडनी : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे, जिथे दोन्ही संघ तीन वनडे आणि पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहेत. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व पॅट कमिन्स नव्हे तर मिचेल मार्श करेल, कारण कमिन्स दुखापतीमुळे वनडे मालिकेतून बाहेर आहे. दरम्यान, या मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलियासाठी चिंता वाढत आहे. ऑस्ट्रेलियाचे पाच सामना जिंकणारे खेळाडू आधीच वनडे मालिकेतून बाहेर पडले आहेत.

वनडे मालिका सुरू होण्यास अवघे दोन दिवस शिल्लक असताना ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे. स्टार अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीन दुखापतीमुळे संपूर्ण वनडे मालिकेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी मार्नस लाबुशेनला संघात समाविष्ट करण्यात आलं आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया ग्रीनसोबत कोणताही धोका पत्करत नाही, कारण संघ इंग्लंडविरुद्ध अ‍ॅशेस मालिका खेळणार आहे. जोश इंग्लिशही पहिले दोन सामने खेळू शकणार नाही.

पॅट कमिन्सची संघातून अनुपस्थिती ऑस्ट्रेलियासाठी मोठा धक्का आहे. पाठीच्या दुखापतीमुळे कमिन्सदेखील टीम इंडियाविरुद्धच्या वनडे मालिकेचा भाग नाही. त्याच्या जागी मिचेल मार्श ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व करेल.

ऑस्ट्रेलियाचा स्टार फिरकी गोलंदाज अ‍ॅडम झंपादेखील सध्या दुखापतीने त्रस्त आहे. यामुळे तो पहिल्या वनडे सामन्याला मुकण्याची शक्यता आहे. दुसऱ्या वनडे सामन्यात झंपा ऑस्ट्रेलियन संघात परतू शकतो तसेच विकेटकीपर-फलंदाज अ‍ॅलेक्स कॅरीसुद्धा दुखापतीमुळं वनडे मालिकेच्या पहिल्या सामन्याला मुकू शकतो. अशा परिस्थितीत कॅरी दुसऱ्या वनडे सामन्यातही पुनरागमन करू शकतो.



# बेसबॉल आणि सॉफ्टबॉल स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील इंडियन मॉडेल स्कूलमध्ये शुक्रवारी (दि. १७) झालेल्या जिल्हास्तरीय बेसबॉल आणि सॉफ्टबॉल स्पर्धांमध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील १४ वर्षांखालील गटातील मुली आणि मुले या दोन्ही संघांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे. दोन्ही संघांच्या कामगिरीमुळे संपूर्ण शाळा परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळकौशल्य, चिकाटी आणि संघभावना यांचे अप्रतिम प्रदर्शन करत शाळेचे नाव उज्ज्वल केले. या यशामागे प्रशिक्षकांची मेहनत, शाळेच्या व्यवस्थापनाचे मार्गदर्शन आणि पालकांचे अखंड सहकार्य महत्त्वाचे ठरले. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल वतीने सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# सुदेष्णा शिवणकरची 'सुवर्ण' धाव; भारतीय संघात झाली निवड

**सातारा** : जावळी तालुक्यातील खर्शी गावची धावपटू सुदेष्णा शिवणकर हिने राष्ट्रीय अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करत महाराष्ट्रासह साताऱ्याची मान अभिमानाने उंचावली आहे. वारंगळ (तेलंगणा) येथे झालेल्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धेत तिने १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक जिंकून देशातील सर्वात वेगवान धावपटू म्हणून आपले स्थान पक्के केले. तिची २४ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत रांची (झारखंड) येथे होणाऱ्या दक्षिण आशियाई वरिष्ठ अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

या विजयामुळे सुदेष्णाने वर्षातील तीन महत्त्वाच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदकांची हॅट्ट्रिक पूर्ण केली आहे. तिने उत्तराखंड येथे झालेल्या नॅशनल गेम्स स्पर्धेत १०० मीटरमध्ये सुवर्णपदक, रांची येथील सीनियर नॅशनल अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप १०० मीटरमध्ये रौप्य तर गुरुवारी वारंगळ येथे झालेल्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धेत १०० मीटरमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली.






# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेल तसेच नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले होते.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे यात गतिमंद, दिव्यांग व आदिवासी टेबल टेनिस खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संजीव सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी लायन्स क्लब पनवेलच्या अध्यक्ष सुरभी पेंडसे, स्पोर्ट्स प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, नागेश देशमाने, मदन गोवारी, चव्हाण, गौतम म्हस्के, भावना जेसवानी, अमित पोद्दार तसेच अनेक लायन व लिओ सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेचे चीफ रेफ्री शामल डेबार्मा व डी.आर. साळस्कर यांनी उत्तमरित्या काम पाहिले.

**गटनिहाय निकाल (विजेते, उपविजेते)**

गतिमंद मुली : नेहा सूर्यवंशी, आर्या दरेकर, गतिमंद मुले : आदित्य प्रभावारकर, सोहम धनश्री (चौघेही स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान); दिव्यांग खेळाडू : गजानन परमार नवी मुंबई, शक्ती कुमार पनवेल; आदिवासी मुली : प्रतिभा मिरकुटे, यज्ञा पवार दोघीही कमळ विद्यालय कर्जत, आदिवासी मुले : प्रेम मोडक, शरवन पवार दोघेही कमळ विद्यालय कर्जत; नवोदित मुली : धृती गोयल बालभारती पब्लिक स्कूल, ईश्वरी शितोळे विगबोर स्कूल खारघर, मुले : अन्वय काब्रे नवी मुंबई, दक्ष पटेल रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर; ११ वर्षांखालील मुली : आराध्या शेट्टी रेड क्लिप स्कूल उलवे, अर्नय भवर नवी मुंबई, मुले : आराध्य अभिजीत पाटील पेण इंग्लिश मेडियम स्कूल, अर्णव साळावकर डी.डी विसपुते स्कूल; १३ वर्षांखालील मुली : त्रिशा शेखर पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, अर्निशा भवर पालावा वर्ल्ड स्कूल तळोजा, मुले : आदित्य जोग रॉयल इंटरनॅशनल स्कूल, प्राकेत गोयल बालभारती पब्लिक स्कूल; १५ वर्षांखालील मुली : त्रिशा शेखर पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल नवीन पनवेल, श्रेया अशोक जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, मुले : अद्वित गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ, अद्वैत रवि पाटील न्यू होरायझन पब्लिक स्कूल; १७ वर्षांखालील मुली : श्रेया अशोक जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, त्रिशा पावशे डीएव्ही पब्लिक स्कूल, मुले : अद्वित गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ, प्राकेत गोयल बालभारती पब्लिक स्कूल; १९ वर्षांखालील मुली : रूद्रा राजेश सरवणकर सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल, श्रेया अशोक जानकर सीकेटी स्कूल नवीन पनवेल, मुले : अद्वित गुप्ता डीपीएस स्कूल नेरूळ, बीतीहात्रा चक्रवर्ती नवी मुंबई; महिला : प्राची सातारडेकर नवी मुंबई, ईश्वरी शितोळे वीगबोर स्कूल खारघर; पुरुष : मनीष सकलानी तळोजा, सनित पाटील नवीन पनवेल; ज्येष्ठ पुरुष : मनीष सकलानी तळोजा, विलास धांडे खारघर.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com